शनिवार, १५ ऑक्टोबर २०२२
◆ वर्ष १५ ◆ अंक ८८
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अंतरंग

...तर ‘मातोश्री’ वाचविण्याची वेळ येईल -ना. राणे/२
परतीचा पाऊस झाला वैरी; शेतात व बळीराजाच्या डोळ्यांत पाणी/५
आशिया चषक स्पर्धा; आज भारत वि. श्रीलंका फायनल/८

### ठाकरे गटाचे ‘मशाल’ चिन्हही जाणार?

**मुंबई** : अंधेरी पूर्व मतदारसंघात होणाऱ्या पोटनिवडणुकीमुळे राजकीय वातावरण तापले आहे. मागील काही दिवसांपासून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि भाजप-शिंदे गटातील संघर्षामुळे अत्यंत प्रतिष्ठेच्या बनलेल्या अंधेरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी शुक्रवारी ऋतुजा लटके आणि मुरजी पटेल यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला, मात्र शिवसेनेच्या अडचणी थांबण्याची चिन्हे दिसत नाहीत. निवडणूक आयोगाने शिवसेनेला दिलेल्या ‘मशाल’ या चिन्हावर समता पक्षाने काही दिवसांपूर्वी दावा केला होता. त्यानंतर आता अंधेरी पोटनिवडणुकीत शिवसेनेला मशाल चिन्ह देऊ नये, अशी मागणी समता पक्षाने केली आहे. याबाबत समता पक्षाकडून दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात येणार आहे.

# खांदा कॉलनीत उद्या मोफत आरोग्य तपासणी व औषध वाटप महाशिबिर

## सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांची लाभणार प्रमुख उपस्थिती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळ, भारतीय जनता पक्ष पनवेल आणि रायगड मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. १६) खांदा कॉलनीमधील सीकेटी महाविद्यालयात मोफत आरोग्य तपासणी व औषध वाटप महाशिबिर आयोजित करण्यात आले आहे. यंदाचे हे १३वे महाशिबिर असून त्याचे उद्घाटन सकाळी ९ वाजता राज्याचे सार्वजनिक बांधकाम आणि अन्न व नागरी पुरवठामंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते होणार आहे.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर असणार आहेत. या वेळी भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्यासह इतर लोकप्रतिनिधी व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जन्मदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती या सेवा पंधरवड्यानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. या अंतर्गत हे महाशिबिर होणार आहे. या महाशिबिराच्या अनुषंगाने प्राथमिक तपासणी शिबिर नुकतेच झाले असून मोफत आरोग्य तपासणी व मोफत औषध वाटप महाशिबिर रविवारी खांदा कॉलनीमधील सीकेटी महाविद्यालयात सकाळी ९ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत होणार आहे. (पान २ वर..)

# माजी आमदार अवधूत तटकरे भाजपमध्ये

## उद्धव सेनेला अखेरचा ‘जय महाराष्ट्र’

**मुंबई : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील माजी आमदार अवधूत तटकरे यांनी उद्धव ठाकरे शिवसेनेला अखेरचा ‘जय महाराष्ट्र’ करीत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत शुक्रवारी (दि. १४) मुंबईत हा पक्षप्रवेश झाला. अवधूत तटकरे हे राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस खासदार सुनील तटकरे यांचे पुतणे आणि माजी आमदार अनिल तटकरे यांचे पुत्र आहेत.

मुंबई भाजप प्रदेश कार्यालयात झालेल्या या पक्षप्रवेश कार्यक्रमास सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण, भाजप रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर,



आमदार नरेंद्र मेहता आदी उपस्थित होते.

राष्ट्रवादीतून आपल्या राजकीय कारकिर्दीला सुरुवात करणारे अवधूत तटकरे यांनी रोहा शहराचे नगराध्यक्षपद भूषविले आहे. त्यानंतर श्रीवर्धन मतदारसंघाचे आमदार म्हणून प्रतिनिधित्व केले. त्यांनी राष्ट्रवादीला सोडचिठ्ठी देऊन शिवसेनेत प्रवेश केला होता, मात्र शिवसेनेने राष्ट्रवादीला जवळ केल्यामुळे अवधूत तटकरे यांनी नाराजी व्यक्त करीत स्वार्थी राजकारणापासून चार हात दूर राहणे पसंत केले.

भाजपचे सक्षम नेतृत्व, सर्वसमावेशक विकासकार्य आणि व्यापक वाटचाल लक्षात घेऊन त्यांनी शुक्रवारी समर्थकांसह भाजपमध्ये प्रवेश केला. त्यांचे स्वागत करण्यात आले. (पान २ वर..)

### मीरा भाईंदरचे तीन नगरसेवकही दाखल

भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत शुक्रवारी मीरा भाईंदरच्या चार नगरसेवकांनीही भाजपमध्ये प्रवेश केला. यात उद्धव ठाकरे शिवसेनेच्या नगरसेविक दिप्ती भट्ट, अनिता पाटील व कुसुम गुप्ता आणि काँग्रेसचे नगरसेवक नरेश पाटील यांचा समावेश आहे.

# भाजपकडे विकासाचे व्हीजन -आमदार महेश बालदी

## ■ ग्रामपंचायत निवडणुकीत साथ देण्याचे मतदारांना आवाहन

**खालापूर : प्रतिनिधी**

उरण विधानसभा मतदारसंघात २०१९ची निवडणूक लढवत असताना उरणला पनवेलसह खालापूर तालुकाही जोडला गेला. त्यामध्ये चौक आणि रसायनी-मोहोपाडा हा परिसर अनोळखी असतानाही या विभागात प्रचंड बहुमत मिळाले. याची परतफेड या परिसरातील सर्वसमावेशक विकासकामातून



करणार आहे. यासाठी येथील मतदारांनी चारही ग्रामपंचायतींची सत्ता भाजप युतीला द्यावी, असे विकासाचे व्हीजन आमदार महेश बालदी यांनी मांडले.

चौक, लोधिवली, आसरे व तुपगाव या चार ग्रामपंचायतींच्या निवडणुकीसाठी येत्या रविवारी (दि. १६) मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर बोलताना आमदार महेश बालदी म्हणाले की, केंद्रात भाजपचे सरकार आहे. राज्यातसुद्धा भाजप युतीचे सरकार आहे. ते पाहता आपणही आपल्या गावाच्या विकासासाठी भाजपला साथ देणे आवश्यक आहे. (पान २ वर..)

## मुंबईत कारमधील सर्वांना सीटबेल्ट अनिवार्य

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई पोलिसांनी प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने मोठा निर्णय घेतला असून शहरात आता वाहनचालकासह गाडीत बसलेल्या प्रत्येक व्यक्तीला सीटबेल्ट लावणे अनिवार्य असणार आहे. मुंबई पोलिसांनी या संदर्भात अधिसूचना जारी केली आहे. येत्या १ नोव्हेंबरपासून या निर्णयाची अंमलबजावणी होणार आहे.

मुंबईत आता दुचाकीवरील सहप्रवाशाच्या हेल्मेट सक्तीपाठोपाठ चारचाकी वाहनातील सर्व प्रवाशांना सीट बेल्ट लावणे बंधनकारक करण्यात आले आहे.

**अंधेरी विधानसभा पोटनिवडणूक**

## भाजपच्या मुरजी पटेल यांचा अर्ज दाखल

**मुंबई : प्रतिनिधी**

अंधेरी पूर्व पोटनिवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षातर्फे मुरजी पटेल यांनी आपला उमेदवारी अर्ज शुक्रवारी (दि. १४) दाखल केला. या वेळी बोलताना प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मुरजी पटेल मोठ्या मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास व्यक्त केला.

अर्ज दाखल करतेवेळी मुरजी पटेल यांच्यासोबत भाजपचे मुंबई अध्यक्ष आशिष शेलार, बाळासाहेबांच्या शिवसेनेचे नेते व राज्याचे शिक्षणमंत्री दीपक केसरकर, विधान परिषदेतील भाजपचे गटनेते प्रवीण दरेकर, प्रदेश उपाध्यक्ष



कृपाशंकर सिंह, खासदार मनोज कोटक, आमदार अमित साटम उपस्थित होते. पटेल यांची लढत उद्धव ठाकरे शिवसेनेच्या ऋतुजा लटकेंशी होईल. त्यांनीही अर्ज दाखल केला.

## निवडक

### हिमाचल प्रदेशमध्ये विधानसभा निवडणूक

**नवी दिल्ली** : केंद्रीय निवडणूक आयोगाने हिमाचल प्रदेश विधानसभा



निवडणुकीची घोषणा शुक्रवारी (दि. १४) केली. त्यानुसार तेथे ६८ जागांसाठी १२ नोव्हेंबर रोजी मतदान, तर ८ डिसेंबरला मतमोजणी होणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया १७ ऑक्टोबर ते २५ ऑक्टोबर, २७ ऑक्टोबरला अर्जांची छाननी, तर अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख २९ ऑक्टोबर आहे.

### टी-२० वर्ल्डकपसाठी बुमराहच्या जागी शमी

**नवी दिल्ली** : आगामी टी-२० विश्वचषक



स्पर्धेसाठी भारतीय क्रिकेट संघात मोहम्मद शमीची निवड करण्याचा निर्णय भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) घेतला आहे. दुखापतीमुळे संघातील आघाडीचा जलद गोलंदाज जसप्रीत बुमराह स्पर्धेबाहेर झाला होता. त्याच्या जागी निवड समितीने शमीला संधी दिली आहे. तो अगोदरच ऑस्ट्रेलियाला रवाना झालेला आहे.

# खेरणे ग्रामपंचायत निवडणूक प्रचारात भाजपची आघाडी

## शेकापच्या भूलथापांना जनता कंटाळली -शैलेश माळी



(छाया : योगेश पाटील)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यात येत्या रविवारी म्हणजेच १६ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या एकमेव खेरणे ग्रामपंचायतीच्या निवडणुकीचा प्रचार शिगेला पोहचला असून यात भाजपने मुसंडी मारली आहे. २५ वर्षांपासून भोळ्याभाबड्या ग्रामस्थांची फसवणूक करणाऱ्या शेकापची सत्ता उलथवून टाकण्याचा ग्रामस्थांनीही निर्धार केल्याचे पहावयास मिळत आहे, असे भाजपचे थेट सरपंचपदाचे उमेदवार शैलेश माळी यांनी सांगितले.

खेरणे ग्रामपंचायतीमध्ये ११ सदस्य व थेट सरपंच मिळून १२ संख्या आहे. भाजपचे सरपंचपदाचे उमेदवार शैलेश माळी आपल्या सहकाऱ्यांसोबत निवडणूक रिंगणात उतरले आहेत. शैलेश माळी त्यांना त्यांचे काका बुधाजी माळी यांचा राजकीय अनुभव आणि गावातील नागरिकांची मोलाची साथ मिळत असल्याने ते खेरणे ग्रामपंचायतीचा गड जिंकतील, असे चित्र दिसते. त्यांच्यासोबत प्रभाग क्रमांक १मधून रूपाली चंद्रकांत गोंधळी, राजेंद्र आत्माराम गोंधळी, प्रभाग क्रमांक २मधून सुरेखा रंजीत गोंधळी, प्रिया विलास गोंधळी, अशोक गणपत गोंधळी, (पान २ वर..)

# पनवेलमध्ये किल्ले स्पर्धेच्या पोस्टरचे प्रकाशन

## संस्कृतीचे महत्त्व वाढावे यासाठी आयोजन -परेश ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप युवा मोर्चा पनवेल शहरच्या वतीने दीपावलीनिमित्त किल्ले स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते या स्पर्धेच्या पोस्टरचे प्रकाशन गुरुवारी (दि. १३) करण्यात आले. आपल्या संस्कृतीतील किल्ले बनवण्याच्या कलेचे महत्त्व वाढावे यासाठी ही स्पर्धा महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी या वेळी केले.

(छाया : संकेत भोईर)



पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात झालेल्या या पोस्टर प्रकाशन कार्यक्रमास माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेवक अजय बहिरा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, राजश्री वावेकर, रूचिता लोंढे, पनवेल शहर सरचिटणीस अमरीश मोकल, खजिनदार संजय जैन, युवा नेते केदार भगत, भाजप युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, सचिव चिन्मय समेळ, विवेक होन, उदित नाईक, पनवेल शहर अध्यक्ष रोहित जगताप, (पान २ वर..)



# ...तर ‘मातोश्री’ वाचविण्याची वेळ येईल

## भाजप नेते नारायण राणे यांचा उद्धव ठाकरेंना इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**

उद्धव ठाकरेंकडे काहीही राहिले नाही. राज्य गेले, मुंबई गेली, तरीदेखील त्यांची भाषा सुधारत नाही. असेच सुरू राहिले तर, मातोश्री वाचविण्याची वेळ येईल, असा टोला राणे यांनी उद्धव ठाकरेंना लगावला.

भाजप नेते केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी शुक्रवारी (दि. १४) दक्षिण मुंबईत पत्रकार परिषदेत बोलताना शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली. या वेळी मुंबई भाजप अध्यक्ष आशिष शेलार यांचीही उपस्थिती होती. सध्या राज्याच्या राजकारणात सर्वाधिक चर्चेचा विषय असलेल्या अंधेरी पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप आमदार नितेश राणेंनी रमेश लटकेंचा मातोश्रीवर उद्धव ठाकरेंकडून अपमान झाला होता, असे म्हटले आहे. यावरही नारायण राणेंनी प्रतिक्रिया दिली. सर्व पक्ष एकत्र आले म्हणजे शक्ती तयार होत नाही. त्यांच्यात एकमत कुठे आहे? असा सवाल राणे यांनी केला. भाजपची देशात, महाराष्ट्रात आणि सर्वाधिक राज्यात सत्ता आहे, असे म्हणत राणे यांनी उद्धव ठाकरेंना भाषा सुधारण्याचा सल्ला दिला.



ते म्हणायचे सरकार पाडून दाखवा, आम्ही सरकार पाडून दाखवले. आता आम्ही मैदानात आहोत. त्यामुळे आता तरी उद्धव ठाकरे यांनी सुधारावे, असे आवाहनही राणे यांनी दिले.

नारायण राणे म्हणाले, नितशे राणे काय म्हणाले हे मला नेमकं माहित नाही, माझे याबाबत त्यांच्याशी बोलणे झालेले नाही, पण मला एवढी माहिती होती की, रमेश लटके असते तर आज शिंदे गटात असते, असा दावाही राणेंनी व्यक्त केला.

## युनिव्हर्सल कंपनीच्या ऑइल प्लांटमध्ये आग



**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

ढेकु औद्योगिक वसाहतीतील साजगाव येथील युनिव्हर्सल इंडस्ट्री इस्टेटमधील एका ऑइल प्लांटमध्ये टँकरमधून ऑइल खाली करीत असताना आग लागून दोन कामगार जखमी झाले. घटनास्थळी तीन अग्निशमन दलाच्या गाड्यांनी आगीवर नियंत्रण मिळवले. ही घटना शुक्रवारी (दि. १४) सायंकाळी ५.३० वाजण्याच्या सुमारास घडली.

**दोन कामगार जखमी**

दोन्ही जखमी कामगारांना खोपोली नगरपालिकेच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. खोपोली फायर ब्रिगेड व पोलीस दाखल होत आग कशी लागली याची माहिती घेत आहेत. दरम्यान खोपोली गेस्ट हाऊस जवळील महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या पॉवर ग्रीडमधून थेट कंपनीच्या फीडरवर लाईन गेली आहे. त्याच लाइनच्या खांबाला आग लागलेल्या कंपनीतील टँकरने धडक दिल्याने फीडरचे मोठे नुकसान झाले. ढेकू, साजगाव, होनाड, टेंभेवाडी, चिंचवली, आडोशी, आत्करगाव, औद्योगिक वसाहत व रहिवाशी परिसरातील वीजपुरवठा दोन तास खंडित झाला.

## पनवेल, मुंबई, ठाण्यात पर्जन्यवृष्टी सुरूच

**वाहतूकही मंदावली**



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिवसभर कडक उन्हानंतर सायंकाळी ४ वाजण्याच्या दरम्यान पनवेल, मुंबई शहर आणि ठाण्यात जोरदार पावसाची बॅटींग शुक्रवारीही (दि. १४) सुरू होती. पावसामुळे सामान्य जनजीवन विस्कळीत झाले आहे.

पश्चिम उपनगरात चार वाजल्यापासून परिसरात मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागकडून व्यक्त करण्यात आली होती. मुंबई, ठाण्यासह पुण्यातदेखील परतीच्या पावसाने जोरदार हजेरी लावली आहे.

शुक्रवारी सर्वच ठिकाणी दिवसभर कडक उन्हाचा सामना नागरिकांना करावा लागला, मात्र अचानक सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास अंधार झाल्याने नागरिकांची भांबेरी उडाली. त्यानंतर काही वेळातच ढगांच्या गडगडाट व विजेच्या कडकडाटासह पावसाने हजेरी लावली. अंधारून आल्याने वाहनचालकांना गाडीचे दिवे लावून वाहने चालवावी लागत होती, यामुळे वाहतूक संथ गतीने सुरू होती.

## सांस्कृतिक युवा महोत्सवात उरण महाविद्यालयाचे यश

**उरण : रामप्रहर वृत्त**

मुंबई विद्यापिठाने आयोजित केलेल्या ५५व्या सांस्कृतिक युवा महोत्सवामध्ये विद्यापीठात झालेल्या अंतिम फेरीमध्ये एकूण सहा स्पर्धांमध्ये कोकण ज्ञानपीठ, उरण महाविद्यालयाचे विद्यार्थी सहभागी झाले होते. या स्पर्धांमध्ये उरण महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले आहे.

सांस्कृतिक युवा महोत्सवातध्ये मराठी एकांकिका, हिंदी एकपात्री अभिनय, पाश्चिमात्य वादन, शास्त्रीय तालवादन, हिंदी कथाकथन तसेच लोकनृत्य अशा स्पर्धा झाल्या. त्यात निशांत कोळी यांने शास्त्रीय तालवादनामध्ये द्वितीय व हिंदी एकपात्री अभिनय स्पर्धेत भूमिका म्हात्रे हिने उत्तेनार्थ पारितोषिक पटकाविले.

या विद्यार्थ्यांना प्रा. डॉ. पराग कारूळकर, यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालय व्यवस्थापन समितीचे सदस्य तसेच प्राचार्य डॉ. बळीराम एन. गायकवाड व इतर सर्व शिक्षकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.



**मुंबई : शिवसेना नवी मुंबई युवती जिल्हा समनव्यक श्वेता म्हात्रे यांनी युवती सेना पदाधिकारी व युवा सेना पदाधिकारी यांच्यासमवेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पाठिंबा जाहीर केला. या वेळी मुख्यमंत्री शिंदे यांच्यासह खासदार श्रीकांत शिंदे यांनी त्यांचे स्वागत करून शुभेच्छा दिल्या. हा प्रवेश कोअर कमिटी सदस्य रूपेश पाटील यांच्या माध्यमातून झाला.**

## मतदानकार्ड आधार क्रमांक जोडण्यासाठी शिबिर

**खालापूर : प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोग, मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांनी जाहिर केलेल्या कार्यक्रमानुसार मतदार यादीतील तपशिलाशी जोडण्याकरिता आणि प्रमाणीकरणासाठी मतदारांकडून आधारची माहिती संग्रहित करण्यात येणार आहे. खालापूर तालुक्यातील मतदारांनी मतदार यादीतील तपशीलाशी आधार क्रमांक जोडण्यासाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन उपविभागीय अधिकारी अजित नैराळे व खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी यांनी केले आहे.

मतदार यादीत नाव समाविष्ट असलेली प्रत्येक व्यक्ती त्याचा आधार क्रमांक उपलब्ध करून देऊ शकतो. जर आधार क्रमांक नसेल तर मतदार नमुना नं. ६ ब मध्ये नमूद केलेल्या मनरेगा जॉब कार्ड, बँक/पोस्टाचे फोटो असलेले खाते पुस्तक, आरोग्य विमा स्मार्टकार्ड, वाहनचालक परवाना, पॅनकार्ड, आरजीआयने एनपीआर अंतर्गत जारी केलेले स्मार्टकार्ड, भारतीय पारपत्र, फोटोसह पेन्शन कागदपत्र यापैकी कोणताही एक दस्ताऐवज सादर करू शकणार आहेत. या अनुषंगाने शनिवार (दि.१५)व रविवार (दि. १६) सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सर्व मतदान केंद्रांवर विशेष शिबिराचे आयोजन केलेले आहे. मतदारांना त्यांचा आधार क्रमांक ऑनलाइन पद्धतीने www.nvsp.in या संकेतस्थळावर तसेच वोटर हेल्पलाइन अ‍ॅपद्वारे नोंदणी करता येईल. विशेष शिबीरामध्ये उपस्थित राहून मतदार यादीमध्ये नाव असलेल्या सर्व मतदारांनी आपल्या मतदार यादीतील तपशिलाशी आधार क्रमांक संलग्न करून घ्यावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी अजित नैराळे व तहसीलदार खालापूर तथा सहा. मतदार नोंदणी अधिकारी आयुब तांबोळी यांनी केले आहे.

## सामाजिक न्याय विभाग स्थापना दिनानिमित्त कार्यक्रम

**नवी मुंबई : बातमीदार**

सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाला शनिवारी (दि. १५) ९० वर्ष पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त मुंबई विभागात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे.

या दिवशी मुंबई विभागात सहाय्यक आयुक्त समाज कल्याण, मुंबई शहर, उपनगर, ठाणे, पालघर, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या जिल्ह्यांमध्ये तसेच ठाणे, पालघर, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी येथील जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद येथे, अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलामुलींची शासकीय निवासी शाळा, सफाई कामगारांच्या पाल्यांसाठी असणाऱ्या शासकीय निवासी शाळा व शासकीय वसतिगृहामध्ये कार्यक्रम होणार आहेत.


यामध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध कला गुणदर्शन, मान्यवरांची व्याख्याने, वक्तृत्व, निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे, असे प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे.

## उरण वाहतूक पोलीस उपनिरीक्षक संजय पवार राष्ट्रपती पदकाने सन्मानित

**उरण : बातमीदार, प्रतिनिधी**

मुंबई येथे राज्यपाल भगतसिंग कोशयारी यांचे हस्ते व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे उपस्थितीत उरण वाहतूक पोलीस उपनिरीक्षक संजय पवार यांना गुरुवारी (दि. १३) राष्ट्रपती पदकाने सन्मानित करण्यात आले. याचबरोबर रायगड पोलीस दलातील उपनिरीक्षक राजेंद्र मांडे व सहा. पोलीस उपनिरीक्षक हेमंत पाटील यांना ही गौरविण्यात आले.

उत्कृष्ट जनसंपर्कामुळे नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील गंभीर स्वरुपाचे जास्तीत जास्त गुन्हे उघडकीस आणणे, ३३ वर्षांच्या सेवेत वेगवेगळ्या गुन्हेगारी टोळ्यांची गुप्त माहिती काढून धडक कारवाई करणे, नवी मुंबई गुन्हे शाखा, खंडणीविरोधी पथक, दरोडा प्रतिबंधक पथकामध्ये सकारात्मक योगदान व निष्कलंक, गुणवत्तापूर्ण सेवेसाठी संजय पवार यांना गौरविण्यात आले.



राजेंद्र रमाकांत मांडे सन १९८५मध्ये रायगड जिल्हा पोलीस दलामध्ये पोलीस शिपाई पदावर रूजू झाले. पोलीस दलामध्ये अखंड सेवा बजावत असताना केलेल्या उत्तम कामगिरीमुळे त्यांना २२५पेक्षा अधिक बक्षिसांनी गौरविण्यात आले आहे.

हेमंत काशिनाथ पाटील हे सन १९८५ रायगड जिल्हा पोलीस दलामध्ये पोलीस शिपाई पदावर रूजू झाले.

पोलीस दलामध्ये अखंड सेवा बजावत असताना केलेल्या उत्तम कामगिरी प्रित्यर्थ त्यांना २५०पेक्षा अधिक बक्षिसांनी त्यांना गौरविण्यात आले आहे.

पान १ वरून

## खांदा कॉलनीत उद्या मोफत आरोग्य तपासणी व औषध वाटप महाशिबिर

या महाशिबिरात सर्वसाधारण रोग, महिलांचे आजार, हृदयरोग, हाडांचे रोग, मधुमेह, आयुर्वेदिक, होमिओपॅथिक, बालरोग, त्वचा व गुप्तरोग तपासणी, दंतरोग तपासणी, नाक-कान-घसा, सर्व प्रकारच्या रक्त तपासण्या, ईसीजी तपासणी, कॅन्सर तपासणी, क्षयरोग तपासणी आणि औषधोपचार मोफत देण्यात येणार आहेत. त्याचबरोबर ० ते १८ वयोगटापर्यंत २डी इको तपासणी व हृदय शस्त्रक्रिया, डोळ्यांची तपासणी व चष्मे वाटप, तसेच अपंगांना तीनचाकी सायकल वाटप, कर्णबधिरांना श्रवणयंत्र, देण्याबरोबरच मोफत कृत्रिम हात व पाय अर्थात जयपूर फूट बसविण्याचे शिबिरही या वेळी होणार आहे. आयुष्यमान भारत डिजिटल कार्डसुद्धा या शिबिरात तयार करून देण्यात येणार आहेत तसेच दिव्यांगांना प्रमाणपत्र वाटप करण्यात येणार आहे.

महाशिबिरात साधू वासवानी मिशन पुणे, लक्ष्मी आय इन्स्टिट्यूट, एमजीएम हॉस्पिटल कामोठे व कळंबोली, डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटल नेरूळ, भारती विद्यापीठ खारघर, तेरणा मेडिकल कॉलेज नेरूळ, येरळा मेडिकल ट्रस्ट, साईट फर्स्ट केअर, नायर हॉस्पिटल, व्हिट सेंटर, शंकरा आय हॉस्पिटल, अपोलो हॉस्पिटल, टाटा कॅन्सर हॉस्पिटल परळ, सत्य साई संजिवनी हॉस्पिटल खारघर, शुश्रूषा हॉस्पिटल पनवेल या नामांकित वैद्यकीय संस्थांचा सहभाग असणार आहे.

या महाशिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष व भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव परेश ठाकूर, भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, रायगड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. आदेश पाथरे, भाजप खारघर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, कामोठे अध्यक्ष रवींद्र जोशी, कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील यांनी केले आहे.

## माजी आमदार अवधूत तटकरे भाजपमध्ये

अवधूत तटकरेंचा भाजप प्रवेश म्हणजे रायगड जिल्ह्यामध्ये उद्धव ठाकरे यांना झटका आहे व निश्चितपणे कोकणात त्यांना रोज असे झटके बसणार आहेत, असे भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी या वेळी सांगितले.

प्रदेशाध्यक्ष बावनकुळे पुढे म्हणाले की, युतीमध्ये भाजपने रायगडसह कोकणात शिवसेनेला महत्त्व दिल्यामुळे भाजपचे संघटन मजबूत झाले नव्हते. आता भाजप स्वतंत्रपणे संघटना मजबुतीने उभी करीत आहे. रायगड, पालघरसह कोकणात सर्वत्र उद्धव ठाकरे शिवसेनेचे कार्यकर्ते भाजपमध्ये दाखल होत आहेत. मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली कोकणात सर्वत्र भाजप कार्यकर्ते उत्साहाने काम करीत आहेत.

## भाजपकडे विकासाचे व्हीजन -आमदार महेश बालदी

केंद्र आणि राज्य सरकारकडे अनेक विकासकामांसाठी प्रयत्न आणि पाठपुरावा सुरू असून चौक व परिसरात भविष्यात विकासाची गंगा वाहणार आहे. या ठिकाणी कोट्यवधी रुपयांची कामे प्रस्तावित आहेत, तर काही कामे पूर्ण झाली आहेत. भविष्यात येथील ग्रामपंचायती स्मार्ट होतील.

पुढे बोलताना आमदार महेश बालदी यांनी सांगितले की, चौक, लोधिवली, आसरे, तुपगावमधील नागरिकांना घरोघरी फिल्टर पाणीपुरवठा होणार आहे. शुद्ध पाणी मिळण्यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतील हर घर जल मिशन राबविण्यात येणार आहे. याशिवाय सामाजिक सभागृह बांधणे, आदिवासी पाड्यांमध्ये अंतर्गत रस्त्याचे काँक्रीटीकरण करणे, पथदिवे सुरू करणे व नवीन लावणे, चौक येथे अद्ययावत ट्रॉमा केअर सेंटर उभारणे, कचऱ्याची समस्या दूर करण्यासाठी घनकचरा प्रकल्प उभारणे तसेच उरण जवाहरलाल नेहरू पोर्ट ते चौक गावापर्यंत तीन हजार ५०० कोटी रुपये निधीचा चार पदरी रस्ता व्हाया खारपाडा, रसायनी केंद्र शासनाच्या माध्यमातून बांधण्यात येणार आहे. चौक रेल्वेस्थानकाकडे जाणाऱ्या मुंबई-पुणे महामार्गावर पूल बांधणे अशा विकासकामांना येत्या काही महिन्यातच शुभारंभ करून दोन-अडीच वर्षांत प्रकल्प पूर्ण केला जाणार आहे.

मोरबे धरण उशाला आणि कोरड घशाला अशी चौक परिसरात परिस्थिती आहे. ही समस्या मार्गी लावण्यासाठी चौक ग्रामपंचायत हद्दीत जलकुंभ उभारला जाणार आहे. त्यातून शुद्ध पाणीपुरवठा होईल. हातनोली आदिवासी पाड्यामध्ये अंतर्गत रस्त्यांचे काँक्रीटीकरण करणार आहोत. गावातील खराब रस्ते दुरूस्त करून व अंतर्गत रस्ते काँक्रीटीकरण करून ते १० वर्षे टिकतील असे काम करणार. जांभिवली गावच्या नागरिकांचा गावठाण प्लॉट वाटपाचा प्रश्न मार्गी लावणे तसेच गावठाणासाठी संपादित केलेल्या शेतकऱ्यांच्या जमिनींना जास्तीत जास्त मोबदला मिळवून देण्यास प्राधान्य देण्यात येणार आहे. चौक ग्रामपंचायत कार्यालयाशेजारी असणारे सध्याचे सभागृह दुरुस्त झाले असून याच ठिकाणी अतिभव्य, अलिशान व वातानुकूलित प्रबोधनकार ठाकरे नाट्यगृह उभारण्यात येणार आहे. तिथे एक हजार ५०० आसन व्यवस्था असेल असे वातानुकूलित रंगमंच उभारण्यात येणार आहे, अशी माहिती आमदार महेश बालदी यांनी दिली.

यापूर्वी चौक ग्रामीण रुग्णालय वैद्यकीय यंत्रसामग्री पुरविणे ३४.५० लाख, ग्रामीण रुग्णालयासाठी रुग्णवाहिका १७ लाख ५० हजार, स्वामी समर्थ मठ रस्ता काँक्रीटीकरण तीन लाख, चौक पोलीस दूरक्षेत्र हायमास्ट लावणे दोन लाख, ग्रामीण रुग्णालय पत्राशेड एक लाख, गावातील तारापूर येथे सभागृह बांधणे १० लाख, तलाव सुशोभीकरण ३० लाख अशा एकूण एक कोटी २० रुपये खर्चाच्या कामांची पूर्तता करण्यात आली आहे, असे सांगून चौक येथे योगेश शहा ते कृष्ण चंबावडे रस्ता काँक्रीटीकरण व दुतर्फा घरे बांधणे तसेच तीन घर ते तारापूर रस्त्याच्या कडेला पेव्हर ब्लॉक बसवणे तीन कोटी ५० लाख, स. पा. काळे घरापासून ग्रामीण रुग्णालय हातमोडे, हातमोडे ते मुंबई-पुणे महामार्ग १५ लाख, हातनोली गावातील रस्ता १२ लाख, घंटागाडी १५ लाख, रस्ता काँक्रीटीकरण पाच लाख असा चार कोटी ४० लाखांचा निधी उपलब्ध झाला आहे व लवकरच कामाला सुरुवात केली जाणार आहे, असे आमदार महेश बालदी यांनी सांगितले.

चौक ग्रामपंचायत हद्दीतील चौक आदिवासीवाडी, नाणीवली ठाकूरवाडी, वरोसे आदिवासीवाडी, मोरबे आदिवासीवाडी आणि नंबराची ठाकूरवाडी येथे फिरत्या दवाखान्याच्या माध्यमातून आतापर्यंत २४६ रुग्णांवर मोफत वैद्यकीय उपचार करण्यात आले आहेत. या दवाखान्यात नामांकित वैद्यकीय अधिकारी, परिचारिका रुग्णांची तपासणी करीत असतात. औषधेही दिली जातात तसेच काही गंभीर आजारांवर पनवेल व आसपासच्या रुग्णालयात केंद्र शासनाच्या योजनेंतर्गत मोफत वैद्यकीय सेवा पुरवून उपचार केले जात असून याचा फायदा गोरगरीब व आदिवासी बांधव बांधवांना मिळत आहे, असेही आमदार महेश बालदी यांनी शेवटी नमूद केले.

**‘मनोहर भोईर तर सोडाच, उद्धव ठाकरे जरी येऊन इथे उभे राहिले तरी त्यांना हरवेन’**

मनोहर भोईर तर सोडाच, उद्धव ठाकरे तुम्ही जरी इथे उभे राहिलात तरी तुम्हाला हरवेन. छातीला माती लागल्यानंतर कुस्तीत मागे न फिरणारे आम्ही भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते आहोत. त्यामुळे येत्या १७ तारखेला गुलाल अंगावर टाकायला तयार व्हा, अशा शब्दांत उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांनी गुरुवारी चौक येथील जाहीर सभेत विश्वास व्यक्त केला. यावरून ग्रामपंचायत निवडणुकीतील त्यांची देहबोली स्पष्ट होते. जे गाडीची काच खाली करीत नव्हते ते आज मोटरसायकवर फिरत आहेत. हे परिवर्तन आहे, असे सांगत त्यांनी विरोधकांवर निशाणा साधला तसेच रात्र वैऱ्याची आहे. सर्वांनी सावध रहा, असे आवाहन कार्यकर्त्यांना केले आहे.

## खेरणे ग्रामपंचायत निवडणूक प्रचारात भाजपची आघाडी

प्रभाग क्रमांक ३मधून अक्षता सचिन पाटील, सुभद्रा संतू माळी, राजेश रामा माळी, प्रभाग क्रमांक ४मधून संतोष मुरलीधर गोंधळी, प्रतिभा राजेश माळी, महेश नागेश माळी सदस्यपदासाठी मैदानात आहेत. जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी सर्वांनी कंबर कसली आहे. त्यामुळे शेकापची २५ वर्षांची जुलमी सत्ता उलथून नागरिकांना हक्काची ग्रामपंचायत मिळणार आहे.

भाजपचे सरपंचपदाचे उमेदवार शैलेश माळी हे सर्वसामान्य जनतेला समजून घेणारे असून गावचा कायापालट करण्यासाठी ते सज्ज झाले आहेत. शेकापच्या २५ वर्षांच्या राजवटीत गावकऱ्यांना पिण्याच्या पाण्यापासून ते अगदी मुलांच्या शिक्षणासाठी लागणाऱ्या दाखल्यापर्यंत झगडावे लागत आहे. गावात कराच्या रूपाने करोडो रुपये जमा होत असताना गावाला मात्र अनेक समस्यांनी ग्रासले आहे. शैलेश माळी व सहकाऱ्यांच्या विजयाने सर्व समस्यांपासून ग्रामस्थांची सुटका होणार आहे. गावकऱ्यांना बदल हवा आहे. त्यामुळे खेरणे ग्रामपंचायतीवर कमळ फुलेल, असा विश्वास बुधाजी माळी यांनी व्यक्त केला.

विरोधकांच्या मनमानी कारभाराला वाचा फोडण्यासाठी आणि ग्रामस्थांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी भाजपच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन शुक्रवारी (दि. १४) प्रचारातून करण्यात आले. या वेळी बुधाजी माळी, काशिनाथ गोंधळी, वामन माळी, कृष्णा गोंधळी, अरविंद गोंधळी, अनिल गोंधळी, ज्ञानदेव गोंधळी, गुरूनाथ गोंधळी, रमेश माळी, प्रदीप माळी, नरेश माळी, चाहू माळी, कृष्णा गोंधळी, धोंडीराम पाटील, शनिवार पाटील, जगदिश गोंधळी, बबन गोंधळी, भास्कर माळी, गणपत मढवी, वासुदेव माळी, रवींद्र गोंधळी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.

## पनवेलमध्ये किल्ले स्पर्धेच्या पोस्टरचे प्रकाशन

उपाध्यक्ष अभिषेक भोपी, रोहित कोळी, अक्षय सिंग, देवांशु प्रभाळे, नूतन पाटील, नितेश घुगे, अर्जुन भगत, अनिकेत भोईर, श्रावण घोसाळकर, विशांत सपालिया, सिद्धार्थ मोहिते, शुभम कांबळे, अजित सिंग, सिद्धेश खानावकर, रवी संदेपॉल, करण सोनवणे, रोहन माने यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शिवप्रेमी उपस्थित होते. या वेळी परेश ठाकूर यांनी शिवरायांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

# पनवेलमध्ये महिला सक्षमीकरणासाठी पुढाकार

## महापालिकेतर्फे बचत गटांना उद्योजकता विकास प्रशिक्षण

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल महापालिकेच्या वतीने महिला सक्षमीकरणासाठी पुढकार घेण्यात येत असून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्या अंतर्गत दारिद्र्य रेषेखालील बचत गटातील महिलांकरिता सशक्ती महिला उद्योजकता विकास प्रशिक्षणाचे आयोजन १० ते १३ ऑक्टोबर या दरम्यान आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखली करण्यात आले होते.



दीनदयाळ अंत्योदय योजना, राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियानातंर्गत दि लर्निंग लिंक्स फाउंडेशन आणि मास्टर कार्ड यांच्या संयुक्त विद्यामाने हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणामध्ये व्यवसाय कसा करायचा, आर्थिक गुंतवणूक कशी करायची, व्यवसायाबद्दलच्या विविध योजना, डिजिटल व्यवसाय ऑनलाइन मार्केटिंग करणे, व्यवसाय करताना संवाद कौशल्यांचे महत्त्व तसेच कर्ज मिळविताना बिझनेस प्लॅन कसा तयार करावा अशा विविध विषयांवर महिलांना मार्गदर्शन करण्यात आले. या प्रशिक्षणामध्ये एकूण ४० महिलांनी सहभाग घेतला.

प्रशिक्षण हे उपायुक्त कैलास गावडे यांच्या सूचनेनुसार घेण्यात आले. या प्रशिक्षणाचे व्यवस्थापन लर्निंग लिंक्स फाउंडेशन आणि मास्टर कार्ड यांचे प्रशिक्षक कपिल गवळे, दीनदयाळ उपाध्याय अंत्योदय कक्षाच्या तांत्रिक तज्ज्ञ विनया म्हात्रे, नवनाथ थोरात व समुदाय संघटिका ललिता कचवे यांनी केले.

**प्रशिक्षणाचा महिलांना मोठा उपयोग**

***वाढत्या स्पर्धेच्या युगात या प्रशिक्षणामुळे आम्हाला आमचा व्यवसाय वाढविण्यासाठीच्या विविध संकल्पना समजल्या. व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी या प्रशिक्षणाचा आम्हाला मोठा उपयोग झाल्याच्या प्रतिक्रिया या वेळी महिलांनी दिल्या.***





**पनवेल : माझं पनवेल या साप्ताहिकाचे संपादक विशाल सावंत आणि प्रधानमंत्री जनकल्याण योजनेचे पनवेल तालुका अध्यक्ष रोहित कोळी यांना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुक्रवारी वाढदिवसानिमित्त शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप नेते मोतीलाल कोळी, सिद्धेश खानावकर, प्रजेश औचरकर, संतोष पाटील, युवा नेते केदार भगत, पत्रकार मयुरे तांबडे आदी उपस्थित होते.** (छाया : चेतन पोपेटा)

---

## विशेष मुलांनी बनविल्या आकर्षक पणत्या

**उरण : वार्ताहर**

स्वामी ब्रह्मानंद प्रतिष्ठानतर्फे चालवित असलेल्या सीबर्ड स्वीकार विशेष मुलांच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी दिवाळीसाठी आकर्षक पणत्या बनविल्या आहेत. या पणत्या २० ते २०० रुपये दोन नग दराने विकल्या जात आहेत.



शाळेतील विद्यार्थी दरवर्षी राख्या, पणत्या, तोरण, पाकीट, आहेर पाकिट, कागदी पिशव्या बनवित असतात. विशेष मुलांनी तयार केलेल्या वस्तूंना सेंटमेरी, ओएनजीसी, युईएस, भागूबाई चांगू ठाकूर विद्यालय, द नर्चरिंग रूट, नवदुर्गा नवरात्र मंडळ, डीपी वर्ड कंपनी यांच्याकडून मागणी असते. या उपक्रमासाठी शाळेच्या सुपरवायझर माधुरी उपध्ये, पल्लवी परदेशी, मानसी पांचाळ, राकेश म्हात्रे, प्रशांत कदम, गणेश जाधव, स्नेहल राणे, माधुरी मयेकर आदी मेहनत घेत आहेत.

### ४० विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव

*१ सप्टेंबर १९९९ रोजी बेलापूर येथील शिरीष पुजारी यांनी उरण येथे अवघ्या पाच मुलांपासून विशेष मुलांसाठी शाळा सुरू केली होती. आज या शाळेत ४० विद्यार्थी शिकत आहेत. शाळेत एकूण चार वर्ग असून तीन शिक्षक, पाच कर्मचारी आहेत. शाळेच्या पर्यवेक्षक माधुरी उपाध्ये यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक वर्ग मुलांच्या कलागुणांना वाव देण्याचा चांगल्या प्रकारे प्रयत्न करीत आहेत.*

## वाकडी उपसरपंचपदी भाजपच्या रेणुका जमदाडे बिनविरोध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वाकडी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदाची निवडणूक शुक्रवारी (दि. १४) झाली. या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या रेणुका नामदेव जमदाडे यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्यानिमित्त भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी नवनिर्वाचित उपसरपंच रेणुका जमदाडे यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले व पुढील वाटचालीकरीता शुभेच्छा दिल्या.

या वेळी भाजपचे पनवेल तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, पंचायत समिती सदस्य भूपेंद्र पाटील, ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, शिवाजी दुर्गे, सरपंच कुंदा पवार, माजी सरपंच नरेश पाटील, नामदेव जमदाडे, दुंदरेचे माजी उपसरपंच रमेश पाटील, शिरवलीचे सरपंच दीपक बोंडे, माजी उपसरपंच परशुराम रिकामे, लक्ष्मण पाटील, खानावचे उससरपंच बाळाराम पाटील, बाळअराम उसाटकर, मंगेश पाटील, सदस्य ॲड. अरुण पाटील, प्रभावती खुटले, प्रेरणा भोपी, नीतापाटील, पुष्पा सोपान जाधव, रधुनाथ वाघ, मंगेश पाटील, नारायण मढवी, शांताराम पोपेटा, संतोष पाटील, कृष्णा जमदाडे, कचेर पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.





---

## आरोग्य महाशिबिर : यापूर्वी झालेल्या उपक्रमाची चित्रझलक

### यंदाचे शिबिर रविवार दि. १६ ऑक्टोबर २०२२ रोजी












भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून दरवर्षी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि भाजप पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) महाविद्यालयात मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार महाशिबिर आयोजित करण्यात येते. गेली दोन वर्षे कोरोना संसर्गामुळे हे महाशिबिर होऊ शकले नाही. यंदा येत्या रविवारी (दि. १६) ते होत आहे. या पार्श्वभूमीवर आधीच्या महाशिबिरांची चित्रमय झलक...

श्री. नरेंद्र मोदी
मा. पंतप्रधान

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन



श्री. एकनाथ शिंदे
मा. मुख्यमंत्री



महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत प्रोत्साहनपर लाभ

जाहीर आवाहन

महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत अल्पमुदतीच्या पीक कर्जाची नियमितपणे परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना रुपये पन्नास हजार पर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ देण्यासाठी पात्र शेतकऱ्यांची यादी जाहीर करण्यात आली आहे.

प्रसिद्ध केलेल्या यादीमधील शेतकऱ्यांनी आपले आधार कार्ड, कर्जखात्याचे व बचत खात्याचे पासबुक घेऊन संबंधित बँक शाखा किंवा आपले सरकार सेवा केंद्रामध्ये जाऊन आधार प्रमाणीकरण करुन घ्यावे.

ज्या शेतकऱ्यांनी बँक कर्ज खात्यास आधार क्रमांक उपलब्ध करुन दिलेला नाही, अशा शेतकऱ्यांची नावे आधार क्रमांकाची पूर्तता झाल्यानंतर तसेच ज्या ग्रामपंचायत कार्यक्षेत्रामध्ये निवडणूक आचारसंहिता लागू आहे अशा गावातील पात्र शेतकऱ्यांची नावे आचारसंहिता संपल्यानंतर सदर यादीमध्ये समाविष्ट केली जातील.



खालील निकषांनुसार लाभ अनुज्ञेय नसलेल्या व्यक्तींची नावे यादीत समाविष्ट असल्याचे आढळून आल्यास, त्यांनी या योजनेचा लाभ घेऊ नये.

१. कर्जमुक्ती योजनेअंतर्गत कर्जमाफीचा लाभ मिळालेले शेतकरी.
२. महाराष्ट्र राज्यातील आजी/माजी मंत्री/राज्यमंत्री, आजी/माजी लोकसभा/राज्यसभा सदस्य, आजी/माजी विधानसभा सदस्य/विधान परिषद सदस्य.
३. केंद्र व राज्य शासनाचे सर्व अधिकारी/कर्मचारी
४. राज्य सार्वजनिक उपक्रम (उदा. महावितरण, एसटी महामंडळ इत्यादी) व अनुदानित संस्था यांचे अधिकारी व कर्मचारी
५. शेतीबाह्य उत्पन्नातून आयकर भरणाऱ्या व्यक्ती.
६. निवृत्तीवेतनधारक व्यक्ती ज्यांचे निवृत्तीवेतन रुपये २५,000/– पेक्षा जास्त आहे. (माजी सैनिक वगळून)
७. कृषि उत्पन्न बाजार समिती, सहकारी साखर कारखाना, सहकारी सुतगिरणी, नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व सहकारी दूध संघ यांचे अधिकारी व पदाधिकारी (अध्यक्ष, उपाध्यक्ष व संचालक मंडळ)

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
महाराष्ट्र शासन

श्री. अतुल सावे
मा. मंत्री (सहकार)

श्री. देवेंद्र फडणवीस
मा. उपमुख्यमंत्री

संपादकीय

# तिथे विरोध, इथे आग्रह!

इराणी महिलांच्या हिजाबविरोधी आंदोलनाला जगभरातून अनेक स्तरांतून पाठिंबा मिळत आहे, मात्र त्याच सुमारास भारतातील मुस्लिम महिला व मुली जणु हिजाब वापरण्याच्या हक्काची मागणी करीत असल्याचे चित्र निर्माण करण्यात आले आहे.

**हिजाब न घातल्याने अटक केलेल्या २२ वर्षीय महसा अमिनी या तरुणीचा पोलीस कोठडीत मृत्यू झाल्यानंतर इराणमध्ये हिजाबविरोधी तीव्र निदर्शने सुरू आहेत. देशातील अनिवार्य इस्लामिक वेशभूषेच्या नियमांचे उल्लंघन केल्याच्या आरोपाखाली पोलिसांनी अमिनीला ताब्यात घेतले होते. आंदोलनादरम्यान आंदोलक महिलांनी हिजाब फेकून सरकारचा निषेध केला. धर्माच्या नावाखाली आपल्यावर मध्ययुगीन पोशाखबंधने लादण्यात येत असल्याचा जोरदार विरोध मुस्लिम महिलांनी सुरू केला असून केस कापणे, न झाकलेले डोके आणि चेहरा दाखवणे या मार्गांनी त्या आपला विरोध व्यक्त करीत आहेत. त्याउलट भारतात शैक्षणिक संस्थांमध्ये अगदी धर्मनिरपेक्ष शैक्षणिक संस्थांमध्येही मुस्लिम विद्यार्थिनींना हिजाब वापरण्यास परवानगी द्यावी अशी मागणी केली जाते आहे. हा सारा वाद पेटला तो कर्नाटकातील शैक्षणिक संस्थेमधून. कर्नाटक उच्च न्यायालयानेही हिजाबबंदी कायम राखण्याचा निकाल मार्च महिन्यात दिल्यानंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात पोहचले. या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाच्या द्विसदस्यीय खंडपीठाने गुरुवारी विभाजित निकाल दिला. या प्रकरणी आता मोठ्या पीठासमोर सुनावणी होईल. विभाजित निकालात एका न्यायमूर्तींनी हिजाबबंदीचे समर्थन केले. शैक्षणिक संस्थांमध्ये एखाद्या धर्माच्या व्यक्तीला धार्मिक प्रतीकांचा वापर करू देणे हे धर्मनिरपेक्षतेच्या उलट आहे असे या न्यायमूर्तींनी म्हटले, तर हिजाब परिधान करून शाळा-महाविद्यालयांमध्ये जाणे हा मुस्लिम मुलींच्या इच्छेचा प्रश्न आहे असे दुसऱ्या न्यायमूर्तींनी म्हटले. भारतातील वादात हिजाबचा मुद्दा अत्यावश्यक धर्माचरणाशी जोडल्याने हा प्रश्न जटिल बनला आहे. आधुनिक काळात जन्मलेल्या, शाळा-कॉलेजांतील मुस्लिम मुलींना खरोखरच हिजाब परिधान करावासा वाटत असेल? की या संदर्भात त्यांचे व्यक्तिस्वातंत्र्य धुडकावले जात असेल? एरव्ही आपल्याकडचे पुरोगामी व्यक्तिस्वातंत्र्यांच्या बाजूने बोलत असतात, परंतु मुस्लिम मुलींच्या हिजाबप्रकरणी मात्र ते मूग गिळून गप्प आहेत. इराणमधील हिजाबविरोधी आंदोलनात निव्वळ महिलाच नव्हे तर या महिलांचे पती आणि पिताही मोठ्या संख्येने सहभागी झाले. आपल्या कुटुंबातील महिलांना त्यांच्या इच्छेनुसार पोशाख परिधान करण्याचे स्वातंत्र्य मिळाले पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे. या उलट भारतातील मुस्लिम पुरुष कुटुंबातील महिला व मुलींनी हिजाब परिधान केला पाहिजे असा मागास पवित्रा का बरे घेत आहेत? भारतातील स्त्रीवादीही इराणी महिलांच्या हिजाबविरोधी आंदोलनावर गप्प आहेत. काही मोजक्याच स्त्रीवाद्यांनी हिजाबला विरोध ही धार्मिक बाब नाही असे म्हटले आहे. वास्तवत: हिजाबला इस्लाममध्येही कोणतेही धार्मिक अधिष्ठान नाही. हा वाद निव्वळ स्त्रियांच्या हक्कांविषयीचा आहे आणि शालेय संस्थांच्या बाबतीत तर हा मुद्दा त्या संस्थेच्या नियमांचे पालन करण्याशी निगडित होतो. शालेय संस्थांमध्ये निव्वळ त्या-त्या संस्थेचा गणवेशच परिधान करून गेले पाहिजे. या गणवेशातून कुणालाही धार्मिक कारणांखाली सवलत दिली जाता कामा नये. तसे केल्याने संस्थेतील धर्मनिरपेक्षतेला धक्का पोहचतो अशी भारतीय जनता पक्षाची भूमिका आहे आणि त्यास वास्तवत: पुरोगाम्यांचाही आक्षेप असण्याचे काहीच कारण दिसत नाही, परंतु भारतात हिजाबबंदीला धार्मिक राजकारणाचे रूप दिले गेल्याने हा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा बनला आहे हेच खरे.**

# सुधागडातील महिला शेतकऱ्यांचा अभिनव प्रयोग

पाली सुधागडसह संबंध कोकणातील शेतकऱ्यांना वारंवार नैसर्गिक आपत्तीचा सामना करावा लागतोय, अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, ओला दुष्काळ, कोरडा दुष्काळ या आपत्तींसह हवामान बदलाचा येथील पीक उत्पादनावर मोठा परिणाम होतो. कोकणातील माणूस कष्टाळू, जिद्दी मात्र, निसर्गाच्या असमतोलामुळे सातत्याने होत असलेल्या नुकसानीने तो मेटाकुटीला आला आहे. दिवास्वप्नात न राहता कोकणातील महिला शेतकऱ्यांनी आपल्या शेतात एक अभिनव प्रयोग करीत कोकणातील शेतकऱ्यांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे.



आहेराबगाव येथील गजानन महिला बचत गटाच्या महिलांनी संघटित होऊन कृषी क्षेत्रात क्रांती घडवून आणण्यासाठी महत्त्वाचे पाऊल टाकले. या महिलांनी एकत्रित येऊन दोन ते तीन एकरमध्ये भुईमूग व हळदीचे पीक घेतले आहे. त्यांच्या श्रमाचे फलित होऊन आजघडीला पीक बहरले आहे. निसर्ग व हवामानात कितीही बदल झाले अथवा परिस्थिती कोणतीही असो, मात्र खचून न जाता मोठ्या हिमतीने आपण आपल्या ध्येयापर्यंत पोहचायचे यासाठी लागणारे कष्ट उपसण्याची तयारी येथील महिलांनी दाखवली, कृतीत उतरवली.

कृषितज्ञांचे मार्गदर्शन घेऊन शेतकरी महिलांनी भुईमूग व हळदीच्या पिकाचा प्रयोग करण्यासाठी पुढाकार घेतला. भातपिकी असलेली जमीन आता भुईमूग लागवडीखाली आणायची होती. याकरिता महिलांनी सुरुवातीस राब प्रक्रिया अवलंबली, नांगरणी पेरणी करून पिकांची निगा राखली.

राबगाव येथे भुईमूग लागवड करणाऱ्या ज्येष्ठ महिला शेतकरी माधुरी भोईर यांनी सांगितले की, रायगड जिल्हा भाताचे कोठार म्हणून ओळखला जातो, मात्र आता नैसर्गिक आपत्तीचा मोठा फटका भातपिकाला बसतोय. त्यामुळे निसर्गाचा कोप होत असल्याने शेतकरी संकटात सापडलाय. कोकणातील शेती सतत ओलिताखाली येते, पिकांची नासधूस होते. ते लक्षात घेता आम्ही गजानन महिला बचत गट राबगाव यांनी बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली व कृषी केंद्र रोहा यांचे मार्गदर्शन घेतले आणि आम्ही महिलांनी एकत्रित येऊन शेतीत नवीन प्रयोग केला. सलग तीन वर्षे आम्ही भुईमुग व हळदीचे पीक घेत आहोत, या पीक उत्पादनातून चांगला नफा मिळतोय, असे भोईर म्हणाल्या.

महिला शेतकरी सुरेखा भोईर यांनी कोकणातील नैसर्गिक आपत्ती शेतकऱ्यांच्या जीवावर उठली आहे. आम्ही पूर्वी भातपिक घ्यायचो, मात्र पीक कापणीला आले की मुसळधार पाऊस कोसळत असे व भातपिक उद्ध्वस्त व्हायचे. या वर्षीदेखील परतीच्या पावसाने हातातोंडाशी

**खबरबात**
धम्मशील सावंत

आलेला घास गळून पडला आहे, या नित्यनियमित परिस्थितीने आम्ही महिला शेतकरी अक्षरशः रडायचो. मग आम्ही आमच्या काळ्या मातीत भुईमुग लागवडीचा पर्याय अजमावून बघितला. आम्ही कोणतेही रासायनिक खत वापरत नाहीत, तर सेंद्रिय शेती केली जाते. हा आमचा प्रयोग यशस्वी झाला याचा मनस्वी आनंद होतोय.

महिला शेतकरी सरिता वातेरे यांनी आपली व्यथा मांडताना सांगितले की, अवकाळी पावसात भातशेती पूर्णपणे उद्ध्वस्त होते. मग येथील शेतकरी हतबल होतो. जगावे की मरावे अशी त्याची द्विधा मनस्थिती होते, मात्र कोकणातील शेतकरी आत्महत्या करीत नाही. भातशेतीचे उत्पादन घटत असल्याने आम्ही दैनंदिन जीवनात अत्यावश्यक असणारे भुईमुग व हळदीचे पीक घेण्याचा निर्धार केला. आज आमच्या कष्टाचे चीज झाले. तीन एकरमध्ये भरघोस पीक आले असून चांगला आर्थिक नफा होणार आहे.

शेतकरी अंजना भोईर म्हणाल्या की, आम्ही सर्व महिला वयस्कर आहोत. तरीदेखील आम्ही एकत्र आलो व काहीतरी नवीन प्रयोग करण्याचे मनोमन ठरवले. बाजारात शेंगदाणे व हळदीला मागणी आहे. महाराष्ट्र राज्यातील महिलांनी शेतीत नवनवीन प्रयोग करावेत व प्रगती साधावी.

सुधागड तालुक्यातील राबगाव येथील महिला शेतकऱ्यांनी अभिनव प्रयोग करून भुईमूग व हळदीचे भरघोस उत्पादन घेतले असून त्यांच्या या जिद्दी कृतीचे सर्वत्र कौतुक होत आहे.



बदलते तंत्रज्ञान

## सावधान! ५जी अपग्रेडच्या नावाने सुरू झालाय फ्रॉड



आता देशातील काही भागात ५जी नेटवर्क सुरू करण्यात आले आहे. जिओ आणि एअरटेल कंपनीकडून ही सेवा सुरू करण्यात आली आहे. अनेकांच्या मोबाइलमध्ये ५जी नेटवर्क दिसत आहे. मोबाइल यूजर्समध्ये या ५जी टेक्नोलॉजीवरून खूप उत्साह दिसत आहे. अनेक जणांना ५जी नेटवर्कची खूप उत्सुकतासुद्धा आहे, पण ५जी सर्विस सुरू होण्यासोबत भारतात ५जी फ्रॉडसुद्धा सुरू झाला आहे. ५जी सिम अपग्रेडच्या नावाखाली लोकांची फसवणूक केली जात आहे. यासंबंधी सायबर पोलिसांनी अलर्ट राहण्यास सांगितले आहे.

५जी फ्रॉडची बातमी गुरूग्राममधून समोर आली आहे. या ठिकाणी सायबर पोलिसांनी लोकांना ५जीच्या नावावर होत असलेल्या फसवणुकीसंबंधी अलर्ट राहण्याच्या सूचना केली आहे. ५जी सर्विस लाँच होताच यासंबंधीचे फ्रॉडसुद्धा समोर आले आहेत. गुरूग्राम सायबर पोलीस सेलने मोबाइल यूजर्सना सायबर गुन्हेगारांपासून सुरक्षित राहण्यासाठी सल्ला दिला आहे, कारण काही फ्रॉड लोक ४जी सिमला ५जी सिमकार्डमध्ये अपग्रेड करण्याच्या नावाने फसवणूक करीत आहे.

५जी सिम फ्रॉडवरून लोकांना अलर्ट केले जात आहे. काही स्कॅमर ४जी सिम कार्डला ५जी सिम कार्ड मध्ये अपग्रेड करण्याच्या नावाखाली मोबाइल यूजर्स सोबत फेसवणूक करीत आहे. लोकांना फोन केले जात आहेत. त्यांच्या सिम कार्डला ५जी अपग्रेड करण्यास सांगितले जात आहे. या अपग्रेडेशनसाठी लोकांना मोबाइल फोन्सवर वन टाइम पासवर्ड (ओटीपी) पाठवला जात आहे. त्यानंतर त्यांच्या मोबाइल नंबरवरून लिंक बँक अकाउंटला लीक केले जात आहेत. फोनमध्ये ओटीपीद्वारे फ्रॉडसोबत सायबर गुन्हेगार मोबाइल यूजर्सला ५जी अपग्रेडची लिंक पाठवत आहेत. या लिंकवर क्लिक केल्यानंतर स्मार्टफोन्सला हॅक केले जात आहे.

# आत्मभान जपणारे कवी नारायण सुर्वे

नारायण गंगाराम सुर्वे हे मराठी भाषेतील एक महान कवी होते. आपल्या लेखणीतून त्यांनी समाज परिवर्तनाची कवने लिहिली. त्यांचा जन्म १५ ऑक्टोबरचा.

१९२६-२७मध्ये मुंबईतील चिंचपोकळीतील एका कापड गिरणीसमोर रस्त्यावरचा एक अनाथ जीव गंगाराम सुर्वे या मुंबईच्या इंडिया वुलन मिलमध्ये साचेवाला म्हणून काम मरणाऱ्या गिरणी कामगाराने उचलून घरात आणला. त्याच गिरणीत बाईंडिंग खात्यात काम करणाऱ्या गिरणी कामगार काशीबाई सुर्वे यांनी या बाळगलेल्या पोराला स्वतःच्या मुलासारखे प्रेम दिले आणि नारायण गंगाराम सुर्वे हे नावही दिले. परळच्या बोगद्याच्या चाळीत ते वाढले. कमालीचे दारिद्र्य,

**निमित्त**

अपरंपार काबाडकष्ट आणि जगण्यासाठी केलेला संघर्ष यातून नारायण सुर्वे यांचे आयुष्य चांगलेच शेकून निघाले. घरात अठराविश्वे दारिद्र्य असतानाही या नारायणाला चार अक्षरे लिहिता-वाचता यावीत म्हणून दादर, अप्पर माहीम मराठी महापालिका शाळेत घातले गेले. हे दाम्पत्य मूळचे कोकणातील हेताचीवाडी (भुईबावडा) येथील होते. त्यांनी नारायणास मराठी चौथीपर्यंत शिक्षण दिले. पुढील शिक्षण



नारायण सुर्वे यांनी स्वतःच्या हिमतीवर पूर्ण केले. नारायण सुर्वे १९३६मध्ये चौथी इयत्ता उत्तीर्ण झाले आणि गंगाराम सुर्वे गिरणीतून निवृत्त झाले. निवृत्तीनंतर मुंबई सोडून ते कोकणात गावी निघून गेले. गावी जाताना त्यांनी नारायणच्या हातावर दहा रुपये ठेवले आणि समोर होता मुंबईचा विशाल सागर.

मग भाकरीचा चतकोर चंद्र मिळविण्यासाठी नारायण सुर्वे एका सिंधी कुटुंबात घरगडी, हॉटेलात कपबशा विसळणारा पोऱ्या, कुणाचे कुत्रे-कुणाचे मूल सांभाळणारा हरकाम्या, दूध टाकणारा पोरगा अशी कामे करीत वाढले. गोदरेजच्या एका कारखान्यात त्यांनी पत्रे उचलले, टाटा ऑइल मिलमध्ये हमाली केली. काही काळ गिरणीत धागा धरला. बॉबीन भरली. मुंबई महापालिकेच्या शाळेत शिपाई म्हणून नोकरी केली आणि १९६१मध्ये शिपायाचे शिक्षक झाले. महापालिकेच्या नायगाव नंबर १ शाळेत त्यांची शिक्षक म्हणून नोकरी सुरू झाली. ते तेव्हापासून गिरणगावचे सुर्वे मास्तर झाले.

कधी दोन घेत, कधी दोन देत आयुष्याची वाटचाल सुरू असतानाच जिंदगीच्या धगीवर शब्द शेकून घेत त्यांनी मराठी काव्यप्रांतात एक नवा सूर घुमवला. त्यांची पहिली कविता १९५८मध्ये नवयुग' मासिकात प्रसिद्ध झाली. डोंगरी शेत माझं गं....' हे त्यांचे पहिले गाजलेले गीत. एचएमव्ही कंपनीने त्याची ध्वनिफीत काढली. १९६२ साली त्यांनी लिहिलेल्या कवितांचा पहिला संग्रह 'ऐसा गा मी ब्रह्म' प्रकाशित झाला. त्याला राज्य सरकारचा पुरस्कार मिळाला.

सुर्वे यांनी त्यांच्या कवितेतून ईश्वरवाद, प्रारब्ध, उच्च-नीचता किंवा जातीचा कधीही उल्लेख केलेला नाही. त्यांनी मराठी कवितेत कामगारांचे, हातावर पोट असणाऱ्यांचे जग शब्दबद्ध करून आणि त्यांच्या संघर्षातून कृतिशील आशावादाकडे झेपावणाऱ्या आकांक्षांचे चित्रण, पुरोगामी विचारांच्या मुशीतून निघालेल्या शब्दकळेद्वारे केले आणि मराठी कवितेला सामाजिक बांधिलकीचा विशाल आशय प्राप्त करून दिला. १६ ऑगस्ट २०१० रोजी त्यांचे निधन झाले.

**-साभार विकिपीडिया**

**क्लिक...क्लिक...!**



**पनवेल : ब्रह्मचैतन्य मासिक संगीत सभेचे अकरावे पुष्प रंगले. सूर निरागस हो समूहाच्या वतीने आयोजित हा कार्यक्रम गोंदवलेकर महाराज नामस्मरण केंद्रात सादर झाला. या वेळी मंदार भिडे यांचे शास्त्रीय व अभंग गायन झाले. देवेन मराठे यांनी संवादिनी, राकेश कुलकर्णी यानी तबला व सूरज गोंधळी यांनी पखवाजसाथ केली, तर सुखदा घाणेकर यांनी सूत्रसंचालन करून कार्यक्रम रंगतदार केला.**

आरोग्य प्रहर

## डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय कफ सिरप घेऊ नका!

कफ सिरप घेतल्याने गाम्बिया या आफ्रिकी देशात ६६ मुलांचा मृत्यू झाल्याची घटना नुकतीच घडून गेली आहे. त्यामुळे या औषधाच्या दुष्परिणामांची चर्चा पुन्हा एकदा सुरू झाली आहे. आपल्यापैकी बहुतेकजण खोकला झाल्यानंतर कोणी तरी सुचवलेले कफ सिरप घेतात, पण कफ सिरपचेही दुष्परिणाम असतात. खोकल्यावर कफ सिरप हा मुख्य उपचार नाही. खोकला अथवा कफ कशामुळे झाला आहे याची कारणे शोधून मग औषधे दिली गेली पाहिजेत. जिवाणू वा विषाणू, परोपजीवी जंतू वा फंगस (कवक), लर्जी यापैकी नेमकी कारणे काय आहेत हे शोधण्याचे काम डॉक्टरच करू शकतात. त्यानुसार ते औषधांची योजना करतात.



पाऊस-ऊन अशा संमिश्र वातावरणामुळे सर्दी व खोकल्याचे रुग्ण वाढले होते. खोकताना तोंडावर रुमाल ठेवण्याची काळजी घ्यावी. मुलांना खोकला असेल, तर त्यांना शाळेत पाठवू नका. खोकल्याचा संसर्ग इतरांना होऊ शकतो, अशी माहिती डॉ. विकास जोशी यांनी दिली.

खोकला कसा आहे, त्यावर औषधे कोणते द्यावे हे अवलंबून असते. कोरडा खोकला असेल, तर कफ पातळ करणारे घटक ज्या कफ सिरपमध्ये असतात ते द्यावे लागते. खोकताना बेडका पडत असेल, तर कफ सप्रेसंट असणारे सिरप द्यावे लागते. खोकल्याचे सिरप दिल्यावर साधारपणे रुग्णाला झोप आल्यासारखे वाटते. त्याचे कोणत्याही कामात लक्ष लागत नाही. त्यामुळे डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय ही औषधे देऊ नयेत.

आल्यापेक्षा सुंठ टाकून तयार केलेला चहा किंवा कॉफी मध्ये-मध्ये रुग्णाला पाजत राहावी. गरम दुधात हळद घालून ते दूध प्यावे. गरम पाण्याची वाफ घ्यावी. चार-पाच दिवसांपेक्षा जास्त सर्दी, खोकला असल्यास डॉक्टरांना दाखवा. एखाद्या गंभीर आजाराची सुरुवातदेखील असू शकते. त्यामुळे घरगुती उपाय करीत राहण्यापेक्षा वेळेत डॉक्टरांना दाखवून केलेले निदान कधीही चांगले ठरते. निदान काय झाले आहे त्यानुसार डॉक्टर औषधे देतात.

खोकल्याची कारणे शोधून प्रतिजीवात्मक औषधे दिली गेली पाहिजेत. खोकल्याच्या औषधाचे व्यसन लागते. हाही धोका असतो. रुग्णांनी स्वत:च्या मनाने औषधे घेऊ नयेत. विशेषत: दूध पिणारी लहान मुले, स्तनदा माता यांनी हे औषध घेणे टाळावे, असे औषधवैद्यकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. भाऊराव नाखले यांचे मत आहे.

# परतीचा पाऊस झाला वैरी!

## शेतात आणि बळीराजाच्या डोळ्यांत पाणी



**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यात गडगडाटासह परतीचा पाऊस दररोज न चुकता हजेरी लावत असून, हातातोंडाशी आलेले उभे पीक आडवे होताना पाहून शेतकरी हवालदिल झाला आहे. गतवर्षीही परतीच्या पावसाने खालापूर तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले होते. त्यामुळे परतीचा पाऊस वैरी झाल्याची भावना शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे.

तालुक्यात सावरोली, वणवे निंबोडे, माजगाव, रसायनी आणि चौक परिसरात यंदा भातशेती चांगलीच बहरली होती. या वेळी चांगले पीक कणगीत जमा होईल, या आशेवर असलेल्या खालापुरातील बळीराजाच्या आशेवर परतीचा पावसाने पाणी फेरले आहे. गेल्या काही दिवसांपासून परतीचा पाऊस खालापूर तालुक्यात दररोज न चुकता हजेरी लावत आहे. त्यामुळे शेतात आणि बळीराजाच्या डोळ्यात पाणी येत आहे.

खालापूर तालुक्यात भातपिकाचे लागवड क्षेत्र सुमारे ३००० हेक्टर आहे. प्रत्यक्षात २७५४ हेक्टर क्षेत्रावर भातपिकाची लागवड करण्यात येते. यंदा उशीरा पेरणी आणि लावणी झालेली भातशेती चांगली बहरली आहे. भाताच्या लोंब्या तयार झाल्या असून काही भागात भरघोस पीक आले आहे. मात्र कापणी अगोदर परतीच्या पावसाने झटका दिला आहे. त्यामुळे शेतकरी चिंतेत आहे.

अगोदरच भातशेती लागवड क्षेत्र कमी होत असून निसर्गाच्या लहरीपणाचा फटका बसत आहे. गेल्या वर्षीही परतीच्या पावसाने बळीराजाला मोठ्या संकटात टाकले होते. तालुक्यातील ३०८५ शेतकरी परतीच्या पावसाने बाधित झाले होते. मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी हतबल झाला होता. शेतीसाठी मजूर, खत, बियाणे आणि चार महिन्याच्या मेहनतीनंतरदेखील पीक हाती येईल, याची शाश्वती नाही. त्यामुळे शेती बेभरवशाची झाल्याने बळिराजाची झोळी फाटकी राहत आहे.

## बोर्ली मुस्लिम मोहल्ल्यात रस्ता कामाचे भूमिपूजन



**रेवदंडा : प्रतिनिधी**

बोर्ली मुस्लिम मोहल्ल्यातील रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामाचे भूमिपूजन नुकताच रायगड जिल्हा परिषदेच्या माजी प्रतोद मानसी दळवी यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले.

अल्पसंख्याक बहुल ग्रामीण क्षेत्रात मुलभूत व पायाभुत सुविधा योजने अंतर्गत आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रयत्नाने बोर्ली मुस्लिम मोहल्ल्यातील रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविण्यासाठी दहा लाख रुपयांच्या निधी उपलब्ध करण्यात आला आहे. बोर्लीचे माजी सरपंच बापू दळवी यांचा मुलगा मुफिक दळवी यांनी बोर्ली मुस्लिम मोहल्ल्यातील रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविण्याची मागणी केली होती. शिंदे गटाचे भारत मोती यांनी त्यासाठी पाठपुरावा केला होता.

मुस्लिम समाजाच्या वतीने मुफिक दळवी यांनी मानसी दळवी यांचे स्वागत केले. आमदार महेंद्र दळवी यांनी बोर्ली मुस्लिम समाज बांधवांना दिलेला शब्दाची पुर्ती या कामातून केली असल्याचे मुरूड तालुका उपप्रमुख भगिरथ दळवी यांनी या वेळी सांगितले.

बोर्ली येथील समाज सभागृहाच्या नुतनीकरणाचे काम पुर्ण करण्याची मागणी या वेळी बोर्ली मुस्लिम समाजाच्या वतीने मानसी दळवी यांना करण्यात आली. लवकरच निधी उपलब्ध करून मुस्लिम समाज सभागृहाचे काम पुर्ण करण्याचे आश्वासन मानसी दळवी यांनी या वेळी दिले.

शिवसेना-शिंदे गटाचे मुरूड तालुका अध्यक्ष ऋषीकांत डोंगरीकर, महिला आघाडी जिल्हा संघटक शुभांगी करडे, भारत मोती, शाखा प्रमुख राजू भोईर, झिनत हसवारे, माजी सरपंच बापू दळवी, मुफीद दळवी, इम्तीयाज दळवी, यासीन दळवी, बाबू छापेकर यांच्यासह ग्रामस्थ या वेळी उपस्थित होते.

## अभीष्टचिंतन



**मुंबई : भाजपचे विधान परिषदेतील गटनेते व मुंबई बँकेचे अध्यक्ष आमदार प्रवीण दरेकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना भाजपचे रोहा तालुका सरचिटणीस आनंद लाड, सिराज पानसरे, नागोठणे शहराध्यक्ष सचिन मोदी.**

## सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांना नियमित पेन्शन द्या; अन्यथा उपोषण -तुकाराम खांडेकर

**रोहे : प्रतिनिधी**

अनियमित मिळणाऱ्या पेन्शनमुळे रोहा तालुक्यातील सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांची हेळसांड होत आहे. राज्य शासनाच्या सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांप्रमाणे आमचीही पेन्शन वेळेवर अदा करावी, अन्यथा सेवानिवृत्त शिक्षकांना उपोषणाला बसावे लागेल, असा इशारा रायगड जिल्हा सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक सेवाभावी संघाचे जिल्हाध्यक्ष तुकाराम खांडेकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिला आहे.

राज्य शासनाच्या अन्य विभागातील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या बँक खात्यात दरमहिन्याच्या ३० तारखेला पेन्शनची रक्कम जमा होते. मात्र सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांना अनिश्चित व अनियमित तारखांना पेन्शन मिळत आहे. आपली हक्काची पेन्शन वेळेत मिळात नसल्यामुळे रोहा तालुक्यातील वयोवृद्ध व आजारी सेवानिवृत्त शिक्षकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांमध्ये अनेक वयोवृद्ध झाले असून काहीं गंभीर आजारांनी त्रस्त आहेत.काहींची उपजीविका व औषधोपचार हे सर्व महिन्याकाठी मिळणाऱ्या पेन्शनवर अवलंबून असते. अशा परिस्थितीत हक्काची पेन्शन वेळेत मिळत नसल्यामुळे त्यांना दुसऱ्यांकडे हात पसरावे लागत आहेत.

सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांना पेन्शनबाबत पंचायत समिती, जिल्हा परिषद शिक्षण विभाग यांच्याकडे वारंवार विचारणा करावी लागते. वारंवार पत्रव्यवहार करूनही जिल्हा परिषद त्याची गंभीर दखल घेत नाही. शासनाकडून अनुदान आले नसल्यामुळे पेन्शन देण्यास वेळ लागत असल्याचे जिल्हा परिषदेकडून प्रत्येक वेळी सांगण्यात येते, असे सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक सेवाभावी संघाचे जिल्हाध्यक्ष तुकाराम खांडेकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकामध्ये म्हटले आहे.

सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षकांना वेळच्यावेळी पेन्शन मिळावी, अन्यथा उपोषण करण्याचा इशारा तुकाराम खांडेकर यांनी या प्रसिध्दी पत्रकात दिला आहे.

## पेणच्या जिते गावाजवळ बस कलंडली

### सुदैवाने ५० प्रवासी बचावले

**पेण : प्रतिनिधी**


तालुक्यातील जिते गावाजवळ ब्रेक निकामी झाल्यामुळे गुरुवारी (दि. १३) अलिबाग-पनवेल एसटी बसला अपघात झाला. या वेळी बसमध्ये ५० प्रवासी होते. त्यांना चालक आणि वाहकाने सर्व प्रवाशांना बसमधून सुखरूप उतरविले.

अलिबाग-पनवेल एसटी बस (एमएच-२०,बीएल-१६७२) गुरुवारी पेणजवळील जिते गावच्या हद्दीत एका खड्ड्यात आपटली. त्यामुळे बसच्या एका बाजूची स्प्रिंग तुटली व ब्रेक निकामी झाले. व बस एकाबाजूस कलंडता कलंडता वाचली. यावेळी चालक आणि वाहकाने प्रसंगावधान राखून सर्व प्रवाशांना बसमधून उतरविले व बस कलंडू नये, यासाठी



तिला बांबूचा आधार लावून ठेवला. पेण आगारामधून मॅकेनिक आल्यानंतर सदर बस सायंकाळपर्यंत दुरुस्त करण्यात आली.

# मिसाईल मॅन डॉ. एपीजे अब्दुल कलाम



**स्वप्न ते नसतं जे तुम्ही झोपेत पाहता....**
**स्वप्न ते असतं जे तुम्हाला झोपू देत नाही....**

असे स्वप्नांचे पंख देणारे स्वप्नपूर्तीसाठी लढायला लावणारे प्रतिकूल परिस्थितीवर मात करीत शून्यातून विश्व निर्माण करणारे, युवकांचे प्रेरणास्थान असणारे, महान वैज्ञानिक, द्रष्टे महापुरुष आपल्या देशाचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम.१५ ऑक्टोबर १९३१ रोजी तामिळनाडू राज्याच्या रामनाथपुरम जिल्ह्यातील रामेश्वरम येथे त्यांचा जन्म झाला. त्यांचे पूर्ण नाव अबुल पाकीर जैनुलाबद्दीन अब्दुल कलाम. ज्यांनी उज्ज्वल राष्ट्राचे स्वप्न पाहिलं आणि ते सत्यात उतरविण्यासाठी अहोरात्र परिश्रम केले. एक पेपर विकणारा ते भारताचे राष्ट्रपती हा प्रचंड अविस्मरणीय प्रवास करून युवकांमध्ये आदर्श घालून दिला, तर सकारात्मक विचाराने व आत्मविश्वासाने स्वप्नांच्या पंखांना किती उंच भरारी घेता येते हे संपूर्ण जगाला दाखवून दिले.

डॉ. कलाम यांनी आपले शालेय शिक्षण रामनाथपूरमला पूर्ण केले. लहान वयातच वडिलांचे छत्र गमावल्याने डॉ. कलाम गावात वर्तमानपत्रे विकून तसेच अन्य लहान मोठी कामे करून पैसे कमवित व घरी मदत करीत. गणित विषयात त्यांना विशेष आवड होती. नंतर ते तिरुचिरापल्ली येथे सेंट जोसेफ कॉलेजमध्ये दाखल झाले. तेथे बीएससी झाल्यानंतर मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीत प्रवेश घेतला. प्रवेशासाठी पैसे नसताना त्यांची बहीण असीम जोहरा हिने स्वतःचे दागिने गहाण ठेवून त्यांना पैसे दिले. एरोनॉटिक्सचा डिप्लोमा पूर्ण केल्यानंतर अमेरिकेतील 'नासा' या प्रसिद्ध संशोधन संस्थेत चार महिने एरोस्पेस टेक्नॉलॉजीचे प्रशिक्षण घेतले. अब्दुल कलाम हे लहानपणापासून एक प्रकारे एकलव्याचा आदर्श जपत होते. त्यांची गुरूवरील निष्ठा आणि गुरूभक्ती श्रेष्ठ प्रतीचे होती. गुरूंना मान दिला पाहिजे ही त्यांच्या वडिलांची शिकवण त्यांच्या तन मन बुद्धीत चांगलीच मुरलेली होती. गुरुगोविंद दोनो खडे काके लागू पाव, बलिहारी गुरू आपने गोविंद दियो बताये हा संत कबीरांचा वडिलांनी शिकवलेला दोहा त्यांच्या मनात पक्का बसला होता. गुरूवरील त्यांच्या या श्रद्धेमुळे त्यांना ज्ञान मिळविण्यात यश येत होते. 'श्रद्धावान लाभते ज्ञानम' हेच खरे.

डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम भारताचे ११वे राष्ट्रपती होते, पण त्याही पलीकडे त्यांची ओळख आहे ते आंतरराष्ट्रीय कीर्तीचे शास्त्रज्ञ म्हणून डॉ. कलाम ओळखले जातात. भारताचे मिसाइल मॅन रॉकेट सोडण्यासाठी आवश्यक असलेल्या क्रायोजनिक इंजिन आपल्या देशात तयार करण्याचे ठरवले. त्यासाठी त्यांनी इतर भारतीय शास्त्रज्ञांच्या साह्याने ते इंजिन बनवले. संरक्षण संशोधन विकास संघटना 'डीआरडीओ' आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्था 'इस्रो'मध्य एरॉनॉटिकल इंजिनिअर म्हणून काम करीत होते. भारताच्या क्षेपणास्त्रा विषयक कामात डॉ.कलाम यांचा वाटा मोठा आहे. अण्वस्त्रांच्या विकासात कलाम यांचे सगळ्यात मोठे योगदान आहे. भारत अण्वस्त्रांबाबत सक्षम झाल्याशिवाय महासत्ता बनू शकत नाही अशी भूमिका डॉ. कलाम यांची होती. माहिती- तंत्रज्ञान देशातल्या सर्व लोकांपर्यंत पोहचणं आवश्यक आहे, असे मतही त्यांनी व्यक्त केले. त्यांच्या विचारप्रणालीला गती देणे भारत महासत्ता बनविण्याचे त्यांचे स्वप्न साकार करणे युवकांचे अद्य कर्तव्य आहे.

डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम एक व्यक्ती नव्हती, तर देशाप्रती भव्य-दिव्य काम करणारी संस्था होती. या संस्थेला अनेक हात होते. त्यातील काही हात शास्त्रज्ञांचं काम करीत होते, काही राष्ट्रपतींचं, काही हात समाजकार्यात मग्न होते, काही युवकांना प्रेरित करण्याचे, काही हात मुलांबरोबर खेळण्यात दंग होते, तर काही हात इतर बलाढ्य देशाच्या राष्ट्राध्यक्षांबरोबर शेकहँड करीत होते. डॉ. कलाम नावाच्या या एका संस्थेने भारतीयांना इतकं काही शिकवले आहे की त्यांचे फक्त विचार प्रत्येकाने आचरणात आणले तर बघता बघता भारताचा चेहरा मोहरा बदलून जाईल.

यशस्वी जीवन होण्यासाठी रोज सकाळी पाच वाक्य म्हणावीत असं त्यांचं म्हणणं होतं. ती वाक्यं अशी मी उत्कृष्ट आहे, मी ते करू शकतो, परमेश्वर सतत माझ्याबरोबर आहे, मी यशस्वी आहे आणि आजचा दिवस माझा आहे. त्यांचे लेखन केवळ युवकांना नव्हे, तर आबालवृद्धांना प्रेरित करणारे आहे. उठा, शोक करीत बसू नका, निराश होऊ नका, युवकांनी केवळ सकारात्मक विचार करण्याचं धाडस दाखवा, अडचणीवर मात करा आणि यशस्वी व्हा. अनंत अडचणीतून मार्ग काढून तुम्हाला एखादे यश मिळतं तेव्हा त्या यशाची चव ही अविस्मरणीय असते. स्पर्धा परीक्षांदरम्यान येणाऱ्या अडचणी, अडथळ्यांना घाबरू नका. ते पार केल्यानंतर यशाची गोडी अप्रतिम असेल. आत्मविश्वास असेल आणि कष्ट करण्याची तयारी असेल, तर यश तुमच्यापासून कदापि दूर राहू शकत नाही, असेही ते सांगत असत.

डॉ. कलाम म्हणतात, भारताबाबत माझी तीन स्वप्नं आहेत. पहिले स्वप्न आहे स्वातंत्र्य आज आपण जपले पाहिजे, दुसरे स्वप्न भारताच्या विकासाबाबतचे आहे, तिसरे स्वप्न आहे ताठ मानेने जगापुढे उभे राहणाऱ्या भारताचे. डॉ. कलाम म्हणतात, जर तुम्ही तुमच्या कर्तव्याला सलाम केला तर तुम्हाला कुणालाही सलाम करायची गरज नाही, परंतु जर तुम्ही तुमचं कर्तव्य प्रदूषित केलं तर तुम्हाला प्रत्येकालाच सलाम करावा लागेल.

विज्ञानाचा परमभोक्ता असणारे डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांच्या नेतृत्वाखाली भारतीय बनावटीच्या 'एसएलव्ही'चे १८ जुलै १९८० रोजी यशस्वी प्रक्षेपण झाले. या कामगिरीसाठी त्यांना १९८१ साली पद्मभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. शास्त्रज्ञ म्हणून त्यांना ३० विद्यापीठाच्या डॉक्टरेट मिळाल्या. १९९० साली त्यांना पद्मविभूषण पुरस्कार मिळाला, तर १९९७मध्ये त्यांना भारतरत्न या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तूांनी एक अतुलनीय शास्त्रज्ञ, सामान्य माणूस, न भूतो न भविष्यती असे राष्ट्रपती, परिस्थितीवर मात करीत असामान्य कामगिरी करून संपूर्ण जगाचे लक्ष वेधून घेतले. माझ्या मृत्यूनंतर कोणीही आपले काम थांबवू नये असे म्हणणाऱ्या डॉ. अब्दुल कलाम यांचे नाव भारताच्या इतिहासात सदैव अजरामर राहील.

डॉ. कलाम यांनी २७ जुलै २०१५ रोजी वयाच्या ८४व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. तेव्हा घरात आराम करत किंवा बागेत फिरत नव्हते, तर तेव्हाही आपली सर्वांत प्रिय गोष्ट युवकांना प्रेरित करण्याचे काम ते करत होते. खरंच असा 'मिसाईल मॅन' पुन्हा होणे नाही. अशा या प्रेरणादायी व लोकप्रिय व्यक्तिमत्त्वाला सलाम.

**-एच. एन. पाटील, उपशिक्षक,**
**तु. ह. वाजेकर विद्यालय, फुंडे**



# कर्जतमध्ये उद्या फातिमा मातेची तीर्थयात्रा

## दर्शनासाठी देश-परदेशातून येणार भाविक

**कर्जत : विजय मांडे**

ख्रिश्चन धर्मियांचे कर्जतमधील प्रार्थना मंदिर (चर्च) गेल्या काही दशकांपासून फातिमा माऊलीच्या नावाने प्रसिद्ध आहे. प्रत्येक वर्षी १३ ऑक्टोबरनंतर येणाऱ्या रविवारी या मातेची तीर्थयात्रा असते. पूर्वी रेल्वे सेवेच्या फेऱ्या कमी होत्या, त्यावेळी मध्य रेल्वेकडून काही विशेष गाड्या मुंबईहून कर्जतसाठी सोडण्यात येत असत. विशेष म्हणजे राज्यच नव्हे तर देश परदेशातूनही ख्रिश्चन बांधव या यात्रेसाठी आवर्जून उपस्थिती लाव-तात. या रविवारी (दि. १६) ही तीर्थयात्रा असल्याने चर्चचे फादर लुईस कझार यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या यात्रेची जय्यत तयारी सुरु आहे.

१९२० साली फातिमा माऊलीचा पुतळा पोर्तुगाल देशातील लिस्बन शहरापासून ११० किलोमीटर अंतरावर असलेल्या फातिमा नावाच्या छोट्या खेडेगावातून कर्जतमध्ये आणला. कर्जत रेल्वे स्थानकानजिकच्या प्रार्थना मंदिरामध्ये ठेवण्यात आला. या बाबतची अख्यायिका अशी आहे की, १३ मे १९१७ रोजी फातिमा गावातील जेसिंटा, फ्रांसिस व लुसिया ही तीन बालके आसपासच्या परिसरात आपली मेंढरे चारत असतांना पवित्र मरिया माऊलीने त्यांना दर्शन दिले. पुढील जून, जुलै, ऑगष्ट, सप्टेंबर व ऑक्टोबर या पाच महिन्यात प्रत्येक १३ तारखेला याच तीन बालकांना मरिया माऊलीने पुन्हा दर्शन दिले व जगातील प्रत्येक मनुष्य पापांपासून कसा वाचविला जाईल व त्याला स्वर्गीय वैभव कसे प्राप्त होईल हा संदेश दिला. मरिया माऊलीने फातिमा गावात दर्शन दिल्याने तिला फातिमा हे नाव देण्यात आले. १९१७ साली शेवटचे दर्शन १३ ऑक्टोबरला दिल्याने दरवर्षी १३ ऑक्टोबरला रविवार आल्यास किंवा त्यानंतर येणाऱ्या रविवारी फातिमा माऊलीची तीर्थयात्रा कर्जतमध्ये भरते. विशेष म्हणजे केवळ ख्रिश्चन बांधवच नव्हे तर अन्य धर्मियसुद्धा आपला नवस फेडण्यासाठी येथे उपस्थित असतात.

कर्जत व फातिमा मातेचे नाते अगदी घट्ट आहे त्याचे कारण असे की, श्रीमंत चिमाजी अप्पांनी वसईवर मोहीम आखली त्यावेळी वसई पंचक्रोशीत जी-जी चर्च होती त्यांच्याकडे आपला मोर्चा वळविला. त्या मोहिमेत काही चर्चचे मनोरे ढासळून गेले, काही चर्चच्या मनोऱ्यांवरून मोठ मोठ्या घंटा आणण्यात आल्या. त्यातील एक भली मोठी घंटा कर्जत मार्गे भीमाशंकरच्या शिखरावर नेली व नाना फडणीसांनी भीमाशंकराच्या हेमाडपंथी मंदिरात ती घंटा बसविली. या घंटेवर पवित्र मरिया माऊलीची छोटीशी मूर्ती कोरलेली आहे. त्यामुळे १७४० च्या सुमारासच मरिया माऊलीचे कर्जतशी नाते जुळले आहे.

फातिमा मातेच्या ८७ व्या तीर्थयात्रेचे या रविवारी आयोजन करण्यात आले असून भाविकांच्या सेवेसाठी कर्जत परिसरातील ख्रिश्चन बांधवांबरोबरच कर्जतकरसुद्धा सज्ज झाले आहेत.

# नवी मुंबईत सुरक्षेचा जागर

## ठिकठिकाणी जनजागृतीपर कार्यक्रम; अग्निशमन दलाचे मॉकड्रील

**नवी मुंबई : बातमीदार**

कोणतीही आपत्ती सांगून येत नाही, मात्र आपत्ती ओढवलीच तर तातडीने करावयाच्या उपाययोजना तसेच आपत्ती येऊच नये यासाठी घ्यावयाची खबरदारी याबाबत प्रत्येकाला माहिती असणे गरजेचे आहे. त्या दृष्टीने जागतिक आपत्ती धोके निवारण दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयासह महापालिका क्षेत्रात विविध ठिकाणी आयोजित करण्यात आलेल्या मॉकड्रीलला चांगला प्रतिसाद लाभला असून या माध्यमातून नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण होत असल्याबद्दल अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले यांनी समाधान व्यक्त केले.



जागतिक आपत्ती धोके निवारण दिनानिमित्त महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यालयातील ॲम्फीथिएटरमध्ये आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या वतीने, अग्निशमन विभागाच्या सहयोगाने आयोजित विशेष जनजागृतीपर उपक्रमानिमित्त त्या आपले मनोगत व्यक्त करीत होत्या. या वेळी आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या उपआयुक्त मंगला माळवे, अतिरिक्त शहर अभियंता तथा अग्निशमन विभागप्रमुख शिरीष आरदवाड, कार्यकारी अभियंता मदन वाघचौडे, शुभांगी दोडे, सुनिल लाड, मनोहर सोनावणे, अग्निशमन अधिकारी पुरुषोत्तम जाधव आणि अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

एखाद्या आपत्तीची माहिती मिळाल्यानंतर त्याठिकाणी पोहचून कार्यवाही सुरू करण्याचा नमुंमपा अग्निशमन विभागाचा प्रतिसादाचा वेळ सरासरी एक ते दीड मिनीट इतका आहे. नवी मुंबईच्या सुरक्षेसाठी सदैव तत्पर असणारे कर्तव्यदक्ष अधिकारी, कर्मचारी ही अग्निशमन दलाची ओळख आहे. अग्निशमन दलाला कमीत कमी काम करावे लागावे, म्हणजेच नवी मुंबई शहर आपत्तीविना सुरक्षित रहावे ही आपल्या सर्व नागरिकांची जबाबदारी असून प्रात्यक्षिकात सांगितलेल्या छोट्या-छोट्या गोष्टींचे अनुकरण सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असल्याचे अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले यांनी नमूद केले.

### शाळांमध्येही प्रात्यक्षिके सादर

**महापालिका मुख्यालयाप्रमाणेच नमुंमपा शाळा क्र. ४, सीबीडी बेलापूर, सिवूड्स ग्रँड सेंट्रल मॉल नेरूळ, हॉटेल तुंगा वाशी, डी मार्ट सेक्टर १० ए ऐरोली, जुई शेरनिटी सोसायटी सेक्टर ८ घणसोली अशा विविध ठिकाणी अग्निशमन विभागामार्फत मॉकड्रील करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये संस्कारक्षम वयात आपत्ती निवारणाविषयी जागरुकता निर्माण करण्याकरिता विविध उपक्रम राबविण्याच्या सूचना अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले यांनी दिल्या.**

सहाय्यक केंद्र अधिकारी देविदास देशमुख यांनी आगीच्या विविध प्रकारांची माहिती दिली व ती लागू नये म्हणून घ्यावयाची खबरदारी सविस्तरपणे सांगितली. आग लागल्यानंतर काय काळजी घ्यावी व कोणत्या उपाययोजना कराव्यात याविषयीदेखील त्यांनी विस्तृत माहिती दिली.

सीबीडी बेलापूर अग्निशमन केंद्र अधिकरी जे. टी. पाटील यांनी आगामी दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर फराळ करताना तसेच फटाके उडविताना घ्यावयाची खबरदारी याबाबत माहिती सांगितली. या वेळी आग, पूर, भूकंप, वादळ, रासायनिक व औद्योगिक आपत्ती याविषयीच्या माहितीपटांचे प्रक्षेपण करण्यात आले. त्याचप्रमाणे महापालिका मुख्यालयाच्या आवारात आग विझविण्यासंबंधी प्रात्यक्षिके करण्यात आली.

## आनंदी, फटाकेमुक्त दिवाळी साजरी करा; 'अंनिस'चे आवाहन



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या बेलापूर शाखेतर्फे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे फटाकेमुक्त दिवाळी अभियान राबवण्यात आले. या अभियानांतर्गत शुक्रवारी (दि.१४ ऑक्टोबर) संवाद सत्र आयोजित करण्यात आले होते. या वेळी अंनिसतर्फे विद्यार्थ्यांना आनंदी आणि फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याचे आवाहन करण्यात आले. या संवाद सत्रात अरूण जाधव व अशोक निकम यांनीही सक्रिय सहभाग नोंदवला.

फटाके फोडण्याची आपली परंपरा आहे, असे समर्थन केले जाते, पण ते योग्य नाही. जुन्या हानिकारक परंपरा बंद करणे हा आधुनिक युगाचा निकष आहे. दिवाळीचा आनंद फटाके न फोडताही द्विगुणीत करू शकतो. फटाके न फोडल्यामुळे शिल्लक राहिलेले पैसे आपण उत्तमोत्तम पुस्तके विकत घेऊन वाचण्यासाठी वापरू शकतो. सुंदर रांगोळी काढून आपल्या कल्पनांना वाव देऊ शकतो. स्वादिष्ट फराळ बनवून त्यांचा आस्वाद घेऊ शकतो. नवीन खमंग पदार्थ बनवायला शिकू शकतो. सुंदर व आकर्षक आकाश कंदील व शुभेच्छापत्र बनवून छंद जोपासू शकतो. इतकेच नाही तर आपल्या गरजू मित्रमैत्रिणींना मदत करून आपण आनंदी होऊ शकतो. आपण आनंदी होताना इतरांनाही आनंदी करीत फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याचे आवाहन महेंद्र राऊत यांनी विद्यार्थ्यांना केले.

## कोकिलाबेन धीरुभाई अंबानी हॉस्पिटलचा वर्धापन दिन उत्साहात



**पनवेल : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील कोकिलाबेन धीरुभाई अंबानी हॉस्पिटलच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाला हॉस्पिटलच्या चेअरपर्सन टीना अंबानी उपस्थित होत्या. त्यांनी रुग्णालयातील सुविधांचा आढावा घेतला, तसेच रुग्ण, डॉक्टर आणि परिचारिकांशी संवाद साधला.

अध्यक्ष टीना अंबानी यांनी हॉस्पिटलमध्ये उपचार घेणाऱ्या गर्भवतींची भेट घेतली आणि नवजात बालकांची प्रकृती जाणून घेतली, तसेच गर्भवती महिला आणि नवजात बालकांना अंबानी यांनी आशीर्वाद दिले. डायलिसिस आणि कर्करोगाच्या रूग्णांसह इतर आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांचीही त्यांनी विचारपूस केली. रुग्णांशी संवाद साधत अंबानी यांनी हास्पिटलमधील अनुभव, हॉस्पिटल आणि नंतरच्या उपचार पद्धतीची चौकशी केली.

## ओरियन मॉलमध्ये विक्रांत युद्धनौका प्रतिकृतीचे प्रदर्शन

**पनवेल : प्रतिनिधी**

स्वातंत्र्याचे अमृत महोत्सव वर्ष साजरा होत असताना देशात प्रथमच घरोघरी तिरंगा झेंडा फडकला. त्यामुळे या वर्षीची दिवाळीदेखील विशेष असून ओरियन मॉलमध्ये आयएनएस विक्रांत युद्धनौकेची प्रतिकृती उभारण्यात आली आहे. या प्रतिकृतीचे उद्‌घाटन भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि. १५) सायंकाळी ६.३० वाजता होणार आहे.

भारताच्या युद्धात आयएनएस विक्रांतची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. भारताची पहिली युद्धनौका म्हणून ओळख असलेल्या या युद्धनौकेच्या चलचित्रांचे प्रदर्शनदेखील ओरियन मॉलमध्ये भरविण्यात येणार आहे. संस्कार भारती, ओरियन मॉल आणि बँक ऑफ महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

या वेळी बँक ऑफ महाराष्ट्राच्या नवी मुंबई व रायगड विभागातील महाव्यवस्थापक अपर्णा जोगळेकर, ओरियन मॉलचे मालक मंगेश परुळेकर उपस्थित राहणार आहेत.

पनवेलकरांना संपूर्ण दिवाळीमध्ये हे प्रदर्शन पाहता येणार आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त 'चला... दिपावलीचा आनंद द्विगुणित करुया, मनामनातील दिप उजळूया, राष्ट्रभक्तीची ज्योत चेतवूया' या घोषवाक्याचा आधारे आयएनएसची प्रतिकृती उभारण्यात आली आहे.

पनवेलकरांनी या प्रदर्शनाला भेट देण्याचे आवाहन ओरियन मॉलचे मालक मनन परुळेकर आणि मंगेश परुळेकर यांनी केले आहे.

## गव्हाण विद्यालयात उर्वरित विद्यार्थ्यांचे लसीकरण

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र गव्हाणच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांच्या उर्वरित विद्यार्थ्यांसाठी कोविड प्रतिबंधक लसीकरणास प्रारंभ झाला.



कोविड प्रतिबंधक लसीकरणाच्या पहिल्या तीन टप्प्यांमध्ये बहुतांश विद्यार्थ्यांचे लसीकरण झाले आहे, उर्वरित विद्यार्थ्यांचे दोन गटात लसीकरण झाले. पहिल्या गटात १२ ते १४ या वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी कर्बोव्हॅक्स ही लस देण्यात आली, तर १५ ते १८ या वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी कोव्हॅक्सिन ही लस देण्यात आली. गव्हाण येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. अस्मिता बोंबटकर यांच्या नेतृत्वाखाली हे शालेय विद्यार्थ्यांसाठी प्रतिबंधक लसीकरण शिबिर आयोजित करण्यात आले. शिबिर यशस्वी करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आरोग्य सेविका शिवकांता मेहत्रे, आरोग्य सेवक मोहन जगताप व जगदीश कदम, मदतनीस हिरकण्या कोळी आणि उपशिक्षक सागर रंधवे व पालक उपस्थित होते.

श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजचे प्रभारी प्राचार्य प्रमोद मंडले आणि ज्येष्ठ अध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर यांनी या शिबिरासाठी नेटके नियोजन केले.

## रिक्षा पायावरून नेल्याने गंभीर दुखापत

**पनवेल : वार्ताहर**

एका व्यक्तीच्या डाव्या पायास रिक्षाची ठोकर बसून झालेल्या अपघातात गंभीर दुखापत झाल्याची घटना पनवेल शहरात घडली.

विश्वास ठाणगे (वय ५०) यांचा वडापाव विक्रीचा व्यवसाय असून लाईन आळी येथील वडापावच्या गाळ्यासमोर एक रिक्षा पंक्चर झाल्याने ती बाजूला घेत असताना अचानक मागून आलेल्या भरधाव रिक्षेने त्यांच्या डाव्या पायास जोरदार ठोकर मारली. त्यामुळे त्यांच्या पायास गंभीर दुखापत झाली. यानंतर रिक्षाचालक पसार झाल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



**पनवेल : भाजप महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत यांनी प्रधानमंत्री जन कल्याणकारी योजना तालुका अध्यक्ष रोहित मोतीलाल कोळी यांना शुक्रवारी वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.**



**पनवेल : खारकोपर येथील ॐ श्री साई सेवा समितीतर्फे खारकोपर ते शिर्डी पालखी पदयात्रेचे गुरुवारी प्रस्थान झाले. ही पालखी २१ ऑक्टोबर रोजी शिर्डी येथे पोहचणार आहे. मंडळाचे हे २२वे वर्ष आहे.**

## पनवेलमध्ये शिवव्याख्यान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी महाराजांना जाऊन तब्बल तीन शतके लोटली तरी त्यांची जयंती, पुण्यतिथी आजतागायत सगळीकडे साजरी होते. जगाच्या इतिहासातील हे एकमेव उदाहरण आहे, असे भावपूर्ण उद्‌गार ज्येष्ठ व्याख्याते काशिनाथ जाधव यांनी काढले.

कोजागरी पौर्णिमेच्या रात्री बालाजी आंगन सोसायटीच्या विशाल प्रांगणात संभाजी महाराजांविषयी व्याख्यान देताना ते बोलत होते. काशिनाथ जाधव यांनी त्यांच्या भाषणात संभाजी महाराजांची थोरवी विविध प्रसंगांच्या आधारे कथन केली. संभाजी महाराजांची योग्यता समजून सांगताना त्यांनी संभाजी महाराजांनी लढून जिंकलेल्या १२५ लढायांचा तसेच त्यांनी जिंकून ताब्यात घेतलेल्या ३६० किल्ल्यांचा आवर्जून उल्लेख केला. संभाजी महाराजांचे विविध भाषांवर विशेषतः संस्कृतवर प्रभुत्व होते. त्यांनी लिहिलेली ग्रंथसंपदा काशीनाथ जाधव यांनी आवर्जून विशद केली.

संस्थेचे अध्यक्ष बालाजी सोनटक्के, डॉ. चिटणीस गोपाळ शितोळे, उपाध्यक्ष व खजिनदार प्रदीप भोपी, व्यवस्थापक संजय पवार, सदस्य दिलीप काळे यांच्या व इतर कार्यकर्त्यांच्या नियोजनाने कार्यक्रम पार पडला. जनजागृती ग्राहक मंचाचे खजिनदार रमेश चव्हाण व सहसचिव राजकुमार ताकमोगे हेदेखील उपस्थित होते.



# ताकई रस्त्याचे काम रखडले

## नागरिकांत नाराजी, खोपोली पालिकेचे आश्वासन हवेत विरले



**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील साजगाव-आडोशी औद्योगिक वसाहत व पंचक्रोशीसाठी अतिशय महत्वपूर्ण असलेल्या ताकई रस्त्याचे काम तातडीने पूर्ण होईल, असे आश्वासन खोपोली नगर परिषद प्रशासनाने दिले होते. मात्र हे आश्वासन हवेत विरले आहे, दोन वर्षांचा कालावधी लोटत आला तरी या रस्त्याचे काम अर्धवट अवस्थेत आहे. काम पूर्णत्वास येत नसल्याने येथील औद्योगिक महासंघ, सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी व सर्वसामान्य नागरिक कमालीचे संतप्त आहेत.

साजगांव-आडोशी औद्योगिक वसाहत व संपूर्ण पंचक्रोशीसाठी अतिशय महत्वपूर्ण असलेल्या ताकई रस्त्याचा पाच किमीचा भाग खोपोली नगरपरिषद हद्दीत येतो. नगर परिषद हद्दीतील रस्त्याचे रुंदीकरण व काँक्रीटीकरण करण्यासाठी एमएमआरडीएच्या माध्यमातून साडेचार कोटी निधी दोन वर्षांपूर्वी मंजूर होऊन, या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली. सुरुवातीला जोरात सुरू झालेले हे काम काही दिवसानंतर रखडले ते अद्यापही त्याच स्थितीत आहे.

सुरुवातीला स्थानिकांकडून जागा देण्याबाबत विरोध तर कधी वन विभागाकडून जागा हस्तांतरणाबाबतच्या आक्षेपामुळे रस्ता रुंदीकरण होण्यात अडचणी निर्माण झाल्या. त्याबाबत प्रशासन व लोकप्रतिनिधीनी एकत्रितपणे मार्ग काढले. सर्व सुरळीत झाल्यानंतर प्रशासनाचे आदेश मिळूनही निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणींचा फायदा घेत संबंधीत ठेकेदाराने, अधिक आर्थिक फायदा घेण्यासाठी या रस्त्याच्या कामाला जाणीवपूर्वक रखडून ठेवले असल्याचा आरोप सर्व पक्षीय नेत्यांनी नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांसमोर झालेल्या बैठकीत केला आहे.

ठेकेदारांच्या या मनमानी कारभार विरोधात फेब्रुवारी २०२१ नंतर, मे २०२१ व यावर्षी जून २०२२ या महिन्यात या भागातील सर्वपक्षीय नेते आक्रमक झाले व आंदोलनाची तयारी सुरू झाली. त्याची दखल घेत मुख्याधिकाऱ्यांनी त्या त्या वेळी बैठका घेऊन सदर रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करण्याचे आदेश ठेकेदार कंपनीला दिले. मात्र दोन वर्षे संपत आले तरी हे काम रखडलेल्या अवस्थेत असल्याने सर्व स्तरातून संताप व्यक्त केला जात आहे.

वर्तमान स्थितीत ताकई रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर चिखल, खड्डे आहेत. त्याचा फटका सर्वांना बसत असून, वाहतूक कोंडीसह अनेक वेळा अपघातही घडत असल्याने सर्वच नागरिक हैराण झाले आहेत.

**चार महिन्यात पूर्णत्वास जाणारे या रस्त्याचे काम दोन वर्षे सुरू आहे. वर्तमान स्थितीत या रस्त्यावरील चिखल, मोठमोठ्या खड्ड्यांनी नागरिक हैराण झाले आहेत. काँक्रीटीकरण पूर्ण होईल तेंव्हा होईल. तोपर्यंत, आहे त्या रस्त्यावरील खड्डे भरून तात्पुरती डागडुजी होण्याची नितांत आवश्यकता आहे.**
**-अतुल पाटील, ग्रामस्थ, ताकई, खोपोली**

**तातडीने काम पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. पावसाळी तीन महिन्यांच्या काळात काम होण्यास अडचणी निर्माण झाल्या. मात्र आगामी दिवसांत काम पूर्ण होण्यासाठी पालिका प्रशासन गांभीर्याने प्रयत्नशील असणार आहे.**
**-अनुप दुरे-पाटील, प्रशासक, खोपोली नगर परिषद**

# अलिबागेतील हिराकोट तलावाचे सुशोभीकरण

## पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते लोकार्पण



**अलिबाग : जिमाका**

रायगड जिल्हा नियोजन समिती अंतर्गत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत अलिबागमधील हिराकोट तलाव परिसरात करण्यात आलेल्या रिटेनिंग वॉलचे बांधकाम, रेलिंग बसविणे आणि उद्यान विकसित करणे, या कामांचे गुरुवारी (दि. १३) पालकमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.

आमदार भरत गोगावले, जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे, नगर परिषदेच्या प्रशासक अंगाई साळुंखे यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी या वेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अजित हरवडे यांनी केले.

ऐतिहासिक हिराकोट तलावाचे संवर्धन व जतनाचे महत्वपूर्ण काम जिल्हा नियोजन समितीमार्फत करण्यात आले. अलिबाग शहरास सरखेल कान्होजी आंग्रे यांचा ऐतिहासिक वारसा असून तो जतन करण्याची जबाबदारी पार पाडण्याचे भाग्य लाभले, याचे समाधान असल्याची भावना प्रशासक अंगाई साळुंखे यांनी या वेळी व्यक्त केली.

# जिल्ह्यात होणार हात धुण्याबाबत जनजागृती

**अलिबाग : जिमाका**

रायगड जिल्ह्यातील सर्व शाळा, अंगणवाडी व ग्रामपंचायतींनी जागतिक हात धुवा दिन विविध उपक्रमांनी साजरा करावा, असे आवाहन रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) शुभांगी नाखले यांनी केले आहे.



स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) या अभियानांतर्गत येणाऱ्या स्वच्छतेचा विविध कार्यक्रमापैकी हात धुणे हा एक महत्वाचा भाग आहे. विद्यार्थी व ग्रामस्थांमध्ये स्वच्छतेविषयी जाणीव समृद्ध होऊन सुदृढ, निरोगी व आनंददायी जीवनासाठी जागतिक स्तरावर १५ ऑक्टोबर हा दिवस दरवर्षी हात धुवा दिवस म्हणून साजरा केला जातो. या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व शाळा अंगणवाडी व ग्रामपंचायतीमध्ये हा दिवस साजरा करण्यात येणार आहे.

ग्रामीण भागात लोकशिक्षण घडवून आणण्यासाठी गावातील सर्व सार्वजनिक ठिकाणी हात धुण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात येणार आहे. यासाठी शाळा, अंगणवाडी व ग्रामपंचायतींमध्ये मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येणार आहे. तसेच शिक्षक व अंगणवाडी सेविका यांनी विद्यार्थ्यांना व बालकांना हात स्वच्छ धुण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविणे आवश्यक असून विद्यार्थ्यांना हात धुण्याचे फायदे व तोटे सांगितल्यास त्यांचे वर्तन बदलास मदत होणार आहे. यासाठी शालेय विद्यार्थ्यांना हात धुण्याचे महत्त्व व त्याचा आरोग्यास होणारा लाभ याबाबत चर्चा व संवाद साधण्यात येणार आहे.

त्याचबरोबर शालेय स्तरावर या दिवसानिमित्त हाताची स्वच्छता या विषयावर निबंध, रांगोळी, वक्तृत्व, चित्रकला, पोस्टर तयार करणे अशा विविध स्पर्धा घेण्यात येणार असून यात जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी ज्योत्स्ना शिंदे-पवार व प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी पुनीता गुरव यांनी केले आहे.

# किसान क्रेडिट कार्डसाठी मंगळवारी विशेष मोहीम

**अलिबाग : जिमाका**

प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेच्या सर्व लाभार्थ्यांना किसान क्रेडिट कार्ड आवश्यक आहे. याकरिता मंगळवारी (दि. १८) किसान क्रेडिट कार्डसाठी विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.

प्रधानमंत्री किसान क्रेडिट कार्ड प्रत्येक शेतकऱ्याकडे असणे आवश्यक असून, शेतकऱ्यांना ज्या बँकेत सन्मान योजनेची रक्कम जमा होते, त्या बँकेत फार्म भरुन देण्याचे आहे. त्यामुळे ज्याच्यांकडे कार्ड नाही, अशा शेतकऱ्यांनी संबंधीत बँकेत फार्म फरुन द्यावयाचे आहेत. किसान क्रेडिट कार्डसाठी १८ ऑक्टोबर रोजी विशेष मोहीम राबविण्यात येणार असून कृषी सहाय्यकांनी आपल्या गावात शेतकऱ्यांकडून फार्म भरून घेवून दत्तक बँकेत जमा करावयाचे आहेत. तसेच शेतकऱ्यांनी क्रेडीट कार्डचा फार्म भरुन देण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी उज्वला बाणखेले यांनी केले आहे.

# वाफेघर वस्तीची एसटी बस बंद

## विद्यार्थी, छोटे व्यावसायिक आणि कामगारांची गैरसोय





**पाली : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्यातील वाफेघर गावात रात्री वस्तीला असणारी असणारी आणि सकाळी पालीला जाणारी एसटी बस बंद करण्यात आली आहे. त्यामुळे सकाळी शाळा व महाविद्यालयात जाणारे विद्यार्थी तसेच कामगार, दूधवाले आदी छोटे व्यावसायिक यांची गैरसोय होत आहे. ही वस्तीची गाडी सुरू करण्यासाठी ग्रामस्थांनी राज्य परिवहन महामंडळ (एसटी) कडे अर्ज केला आहे. मात्र अजूनही कोणतीच दखल घेतली गेलेली नाही.

वाफेघर गावात रात्री वस्तीला येणाऱ्या बसमुळे आजूबाजूच्या गावांतील विद्यार्थी व ग्रामस्थांची सोय होत होती. मात्र ही बस बंद केल्याने त्यांना पदरमोड करत खाजगी वाहनाने पालीला यावे लागत आहे. काही विद्यार्थी व ग्रामस्थ तर पायी चालत येतात. त्यामुळे त्यांना हकनाक त्रास सहन करावा लागत आहे. काही लोकांचा रोजगारसुद्धा बुडत आहे.

ही वस्तीची एसटी बस सुरू करण्यासाठी वाफेघर ग्रामस्थांनी पाली एसटी स्थानक प्रमुखांकडे पत्रव्यवहार केला. मात्र तेथून बस उपलब्ध नसल्याचे कारण देण्यात आले आहे.

**एसटी अभावी विद्यार्थ्यांना शाळा, महाविद्यालयात वेळेवर पोहचता येत नाही, त्यांचा अभ्यास बुडतो. शिवाय विद्यार्थी व ग्रामस्थांना अतिरिक्त पैसे देऊन खाजगी वाहनांतून प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे पैसे व वेळ वाया जात आहे. त्यामुळे ही बससेवा लवकर सुरू करण्यात यावी.**
-राकेश बेलोसे, शिक्षक, पाली, ता. सुधागड

**वाफेघर गावात रात्री वस्तीला जाणारी बस का बंद करण्यात आली, त्याची माहिती घेऊन योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.**
-विकास माने, विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ-पेण.

# खोपोली ज्येष्ठ नागरिक सभेचा वर्धापन दिन उत्साहात




**खोपोली : प्रतिनिधी**

शहरातील खोपोली ज्येष्ठ नागरिक सभा या संस्थेचा २९ वा वर्धापन दिन सोहळा नुकताच साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विवाहाला ५० वर्षे झालेल्या जोडप्यांचा व ७५ वर्षे पूर्ण झालेल्या ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस माजी अध्यक्ष एल. बी. पाटील यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष नारायण चौधरी यांनी प्रास्ताविक केले. ज्या सदस्यांच्या विवाहाला ५० वर्षे पूर्ण झाली, अशा सुप्रिया व सदानंदन मेहंदळे, माणिक व संभाजी पाटील, वर्षा व वसंत गिरी, रेखा व रमाकांत मोदी, अनुराधा व अनंत केदारी, विनिता व रमाकांत श्रीखंडे या दाम्पत्यांचा सन्मान करण्यात आला. वर्धापन दिनानिमित्त संस्थेने सत्यनारायणाची पूजा आयोजित केली होती. दिवसभर संगीत भजनासह अन्य धार्मिक कार्यक्रम सादर करण्यात आले. या वेळी बच्चू जाधव, कमलाकर शिवदे, मधुकर पवार यांनी देणगी स्वरूपात ज्येष्ठ नागरिकांना पुढील कार्यक्रमासाठी आर्थिक हातभार लावला.

कार्यक्रमांचे सूत्रसंचालन निवृत्त शिक्षक रवींद्र घोडके यांनी केले. संस्थेचे सचिव संतोष वाघ, खजिनदार प्रवीण वेदक यांच्यासह इतर सदस्य या वेळी उपस्थित होते. संस्थेच्या उपाध्यक्षा सुप्रिया मेहंदळे यांनी आभार मानले.

# मत्स्यगंधा एक्स्प्रेसच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा रेल्वे स्थानकात बुधवारी (दि. १३) सायंकाळी रत्नागिरीकडे जाणाऱ्या मत्स्यगंधा एक्स्प्रेसची धडक लागून महानंदा महादेव चव्हाण (रा. रोहिदास नगर, रोहा) जखमी झाल्या. त्यांना डॉक्टरांकडे नेले असता, त्यांनी महानंदा चव्हाण यांना मृत घोषित केले. अधिक तपास रोहा पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली व तपासीक अंमलदार ए. जे. पेढवीक करीत आहेत.

# पिंगळेवाडी शाळेत शैक्षणिक साहित्याचे वाटप



**कर्जत : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील श्री साई ट्रस्टच्या वतीने कर्जत तालुक्यातील पिंगळेवाडी येथील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

शाळेचे मुख्याध्यापक हरिभाऊ दहिफळे यांच्या प्रयत्नातून आणि जिल्हा आदर्श शिक्षक दिलीप घुले यांच्या सहकार्याने श्री साई ट्रस्टकडून पिंगळेवाडी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना दप्तर, वह्या, पेन्सिल खोडरबर, कंपास पेटी, चित्रकला वही, स्केच पेन यासारखे शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

या वेळी ट्रस्टच्या संचालिका राधिका घुले, ग्रामपंचायत सदस्य वंदना सराई, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शिवराम पिंगळा, मुख्याध्यापक हरिभाऊ दहिफळे, दिलीप घुले, शिक्षिका संगीता कामटे, अंगणवाडी सेविक बेबी पारधी यांच्यासह विद्यार्थी व पालक उपस्थित होते.



# अखेर माणगावात अग्निशमन वाहन दाखल

**माणगाव : प्रतिनिधी**

कोणत्याही नैसर्गिक आपत्तीशी मुकाबला करणारे रायगड जिल्ह्यातील पहिले अत्याधुनिक सुसज्ज अग्निशमन वाहन गुरुवारी (दि. १३) रात्री माणगावमध्ये दाखल झाले. नगरपंचायत लवकरच या वाहनाचा लोकार्पण सोहळा आयोजित करणार असल्याची माहिती मुख्याधिकारी संतोष माळी यांनी दिली.

रायगड जिल्हा नियोजन समितीने २०२०-२१ या आर्थिक वर्षात माणगाव नगरपंचायतीला अत्याधुनिक सुसज्ज अग्निशमन वाहन मंजूर केले होते. पूल, इमारती, दरडी कोसळणे तसेच आग, पूर, नैसर्गिक आपत्ती यासारख्या दुर्घटनाशी मुकाबला आणि मदत करण्यासाठी या अग्निशमन वाहनात १२५ प्रकारची यंत्रसामुग्री बसविण्यात आली आहे. पूरग्रस्त परिस्थितीत पाण्यात शोध घेणारे कॅमेरे, बिल्डिंग व दरडग्रस्त नैसर्गिक आपत्तीतील मदतीसाठी विकटीम लोकेशन कॅमेरा या वाहनात उपलब्ध आहे. त्यासाठी सुमारे तीन कोटी १७ लाख ८१ हजार रुपये खर्च आला आहे.

तब्बल दोन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर हे अग्निशमन वाहन गुरुवारी रात्री माणगाव नगरपंचायतीत आले आहे. या वाहनासाठी नगरपंचायतीला स्वतंत्र व पुरेशा जागेत अग्निशमन केंद्र उभारावे लागणार आहे. त्याचबरोबर अग्निशमन अधिकारी, स्टेशन सुपरवायझर, फायरमन, ड्रायव्हर कम ऑपरेटर, मदतनीस, वाहन चालक, कुशल तंत्रज्ञ, मनुष्यबळ अशी विविध पदे शासनाच्या नियमानुसार भरावी लागणार आहेत.

# महिला आशिया चषक स्पर्धेची आज फायनल

## बांगलादेशमध्ये घमासान

**ढाका : वृत्तसंस्था**

बांगलादेशमध्ये सुरू असलेल्या महिला आशिया चषक स्पर्धेचा अंतिम सामना शनिवारी (दि. १५) भारत आणि श्रीलंका या संघांमध्ये होणार आहे. भारताने थायलंडला, तर श्रीलंकेने पाकिस्तानला हरवून अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. अंतिम फेरी गाठणारा भारतीय संघ यंदा चांगल्या फॉर्ममध्ये आहे. पाकिस्तानविरुद्धचा एकमेव पराभव वगळता संघाने शानदार कामगिरी केली आहे. युवा सलामीवीर शेफाली वर्मासाठी ही स्पर्धा जबरदस्त ठरली. याआधी सातत्याने अपयशी ठरत असल्याने शेफालीवर बरीच टीका झाली, परंतु थायलंडविरुद्धच्या उपांत्य सामन्यात तिने भारताच्या विजयामध्ये निर्णायक अष्टपैलू खेळ केला. या जोरावर ती सामनावीर ठरली. दुसरीकडे श्रीलंकेने अखेरच्या चेंडूपर्यंत रंगलेल्या सामन्यात पाकिस्तानला केवळ एका धावेने नमवत महिला आशिया चषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. प्रथम फलंदाजी करताना लंकेने २० षटकांत ६ बाद १२२ धावा केल्या होत्या. यानंतर पाकिस्तानला २० षटकांत ६ बाद १२१ धावांवर रोखत लंकेने बाजी मारली. आता विजेतेपदासाठी लंकेचा सामना भारताशी आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार दुपारी १ वा. सुरू होईल.




# ‘पृथ्वी’ अस्त्र बरसले!

## सय्यद मुश्ताक अली चषकात झंझावाती शतक

**जामनगर : वृत्तसंस्था**

मुंबईकर पृथ्वी शॉ याने शुक्रवारी (दि. १४) सय्यद मुश्ताक अली चषक स्पर्धेत पृथ्वीने आसामविरुद्ध चौकार-षटकारांची आतषबाजी करताना ट्वेटी-२०तील पहिले शतक झळकाविले. यासोबतच त्याने भारताचा कर्णधार रोहित शर्माचा १५ वर्षांपूर्वीचा विक्रम मोडला आहे.



दुखापतीतून सावरल्यानंतर पृथ्वीने रणजी करंडक, सय्यद मुश्ताक अली, विजय हजारे आदी स्पर्धांमध्ये सातत्यपूर्ण कामगिरी केली, मात्र त्याचा ट्वेन्टी-२० वर्ल्डकपसाठी विचार झाला, ना नुकत्याच झालेल्या दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या वनडे मालिकेसाठी. त्यानंतर पृथ्वीने सोशल मीडियावर अप्रत्यक्षितपणे आपली नाराजी व्यक्त केली. त्यानंतर त्याने शुक्रवारी तडाखेबंद शतक ठोकून निवड समितीला करारा जवाब दिला आहे.

भारत अ संघाचे प्रतिनिधित्व करताना पृथ्वीने न्यूझीलंड अ विरुद्धच्या वन डे मालिकेतही चांगली कामगिरी केली होती. त्यामुळे त्याला आफ्रिकेविरुद्ध संधी मिळेल अशी अपेक्षा होती, मात्र तसे झाले नाही. त्यानंतर मुश्ताक अली ट्रॉफीत तो सातत्यपूर्ण कामगिरी करतोय. मिझोरामविरुद्ध नाबाद ५५ धावा कुटणाऱ्या पृथ्वीने मध्य प्रदेशविरुद्ध पहिल्याच षटकात ०, ४, ४, ४, ४, ४ असा धुरळा उडवला, तर शुक्रवारी आसामविरुद्ध त्याने पाचव्या षटकात ४, ४, ४, ६, ६, ४ अशी धुलाई केली. अमन खान १५ धावा करून माघारी परतल्यानंतर पृथ्वी व यशस्वी जैस्वाल यांनी दुसऱ्या विकेटसाठी ११४ धावांची भागीदारी केली.

यशस्वी ३० चेंडूंत पाच चौकार व एक षटकार खेचून ४२ धावांत बाद झाल्यानंतरही पृथ्वीची फटकेबाजी सुरूच राहिली. १८व्या षटकात हे वादळ रोखण्यात आसामला यश आले. पृथ्वी ६१ चेंडूत १३४ धावा करून माघारी परतला. त्याने १३ चौकार व नऊ षटकार खेचून अवघ्या २२ चेंडूंत १०६ धावांचा पाऊस पाडला.

ट्वेन्टी-२० क्रिकेटमध्ये मुंबईकडून ही दुसरी सर्वोत्तम वैयक्तिक खेळी ठरली. २०१९मध्ये श्रेयस अय्यरने सिक्कीमविरुद्ध १४७ धावा केल्या होत्या. पृथ्वीने २०१५ साली शोएब शेखने गुजरातविरुद्ध नोंदवलेला ११० धावांचा विक्रम मोडला. श्रेयस अय्यर १०३ (वि. मध्य प्रदेश, २०१९) आणि रोहित शर्मा १०१ (वि. गुजरात, २००७) हे या विक्रमात टॉप फाईव्हमध्ये आहेत.

# चॅम्पियन्स लीग फुटबॉलमध्ये बार्सिलोना-इंटर सामना बरोबरीत



**जिनेव्हा : वृत्तसंस्था**

आघाडीपटू रॉबर्ट लेवांडोवस्कीच्या दोन गोलच्या बळावर बार्सिलोनाने ‘युएफा’ चॅम्पियन्स लीग फुटबॉलच्या लढतीत पिछाडीवरून इंटर मिलानला ३-३ अशा बरोबरीत रोखले, मात्र या निकालानंतरही बार्सिलोनाचे आव्हान साखळी फेरीतच संपुष्टात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आपले आव्हान कायम राखण्यासाठी बार्सिलोनाने उर्वरित दोन्ही सामने जिंकणे आणि इंटरने गुण गमावणे गरजेचे आहे.

इंटरविरुद्ध उस्मान डेम्बेलेने (४०व्या मिनिटाला) गोल करीत बार्सिलोनाला आघाडी मिळवून दिली. दुसऱ्या सत्रात निकोलो बारेला (५०व्या मि.) आणि लॉटारो मार्टिनेझ (६३व्या मि.) यांनी गोल केल्यामुळे इंटरने २-१ अशी आघाडी मिळवली. ८२व्या मिनिटाला लेवांडोवस्कीने बार्सिलोनाकडून बरोबरीचा गोल झळकाविला.

यानंतर रॉबिन गोसेन्सने (८९व्या मि.) गोल करत इंटरला ३-२ अशी आघाडी मिळवून दिली, मात्र भरपाई वेळेत लेवांडोवस्कीने पुन्हा गोल केल्यामुळे बार्सिलोनाने हा सामना बरोबरीत सोडविला.

# रायगड जिल्हा बुद्धिबळ निवड चाचणी स्पर्धा उरणमध्ये

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या मान्यतेने उरण तालुका चेस असोसिएशनतर्फे जिल्हा निवड चाचणी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. उरण जेएनपीटी टाऊनशिप येथे रविवारी (दि. १६) ही स्पर्धा होईल. यातून राज्य स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड केली जाणार आहे.

या स्पर्धेबाबत माहिती देताना उरण तालुका चेस असोसिएशनचे संदीप पाटील यांनी सांगितले की, स्पर्धा १५ वर्षांखालील वयोगट तसेच खुला गट या पद्धतीने होणार आहे. स्पर्धकांना नियम बंधनकारक असतील. स्पर्धकांनी आपली नाव नोंदणी विलास म्हात्रे (८८८८०११४११) किंवा आदित्य पाटील (७०२१४१८८११) यांच्याकडे २०० प्रवेश शुल्क भरून करावी. सहभागाची अंतिम मुदत १५



ऑक्टोबर दुपारी १२पर्यंत आहे.

स्पर्धा रॅपिड पद्धतीने (२५ मिनिटे प्रत्येकी) खेळविण्यात येईल. १५ वर्षाखालील गटात भाग घेण्या साठी जन्मतारीख १ जानेवारी २००७ नंतरची असावी, मुलींच्या गटात जास्त स्पर्धक न आल्यास एकच गटात स्पर्धा खेळवली जाईल. प्रवेश फी भरल्यानंतर आपले नाव, ठिकाण, जन्मतारीख, मोबाइल व्हॉट्सअॅप नंबर पाठविणे बंधनकारक आहे. स्पर्धेचे ठिकाण उरण जेएनपीटी टाऊनशिप येथे आरकेएफ जेएनपीटी विद्यालय आहे.

अधिक माहितीसाठी विलास म्हात्रे-अलिबाग (८८८८०११४११), संदीप पाटील-उरण (९९२०३५१९८३), सुनील कुंभार-उरण (९२२१३०६९१७), कैलास पाटील-उरण (८३६९७९६८७१), प्रीतेश पाटील-उरण (९७०२६६०५७९), चंद्रशेखर पाटील-पनवेल (९४२०७२८५६४), किशोर देशपांडे-गोरेगाव (८८८८२५०२३४), अंकित जोशी-कर्जत (८०८७४४०९३६), रवींद्र पेडवी-पाली (९२२६७३८२९४), सुनील घोलप-नागोठणे (९२८४०८६७०२), राहुल रहाळकर-महाड (७७५६०२४९९९), दिलीप पाटील-मुरूड (९४२१२०२२८२४) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# ऑस्ट्रेलिया, भारत, पाकिस्तान, न्यूझीलंड उपांत्य फेरीत पोहचतील

## टी-२० वर्ल्डकपबाबत वसीम अक्रमचे भाकीत

**दुबई : वृत्तसंस्था**

पाकिस्तानचा माजी वेगवान गोलंदाज वसीम अक्रमने ऑस्ट्रेलियात होणाऱ्या टी-२० विश्वचषकाबाबत भाकीत वर्तविले आहे. अक्रमने दुबईत बोलताना उपांत्य फेरीपर्यंत मजल मारणाऱ्या संघांची नावे सांगितली आहेत.

यजमान आणि गतविजेते ऑस्ट्रेलिया हे विजेतेपद राखण्यासाठी प्रबळ दावेदार आहेत. तथापि, ऑस्ट्रेलियन संघाला भारत, पाकिस्तान, न्यूझीलंड, इंग्लंड आणि दक्षिण आफ्रिका यांसारख्या मजबूत संघांकडून कडवी झुंज पाहायला मिळू शकते. वसीमने यात दोन आशियाई क्रिकेट राष्ट्रांचा समावेश केला ज्यात भारत आणि पाकिस्तान असून ऑस्ट्रेलियासह बाद फेरीत खेळतील असा विश्वास त्याने व्यक्त केला आहे. त्याचबरोबर न्यूझीलंडलाही पहिल्या चारमध्ये पसंती दिली आहे.

ऑस्ट्रेलियात १९९२च्या विश्वचषकात १८ विकेट्स घेतल्याने ऑस्ट्रेलियात गोलंदाजांना कशी मदत करता येईल हेही वसीम अक्रमने सांगितले आहे, तसेच त्याने कबूल केले की, टी-२० प्रकार हा गोलंदाजांसाठी नाही, परंतु ऑस्ट्रेलियात टी-२० विश्वचषकातील वेगवान आणि उसळत्या खेळपट्ट्यांवर वेगवान गोलंदाज खेळात टिकून राहतील. वेग हेच एकमेव ऑस्ट्रेलियात गोलंदाजांच्या यशाची गुरुकिल्ली असेल, असा विश्वास त्याने व्यक्त केला आहे.

मला ऑस्ट्रेलिया, भारत आणि पाकिस्तान यांना उपांत्य फेरीत पाहायचे आहेत, पण दक्षिण आफ्रिका ही आपल्याला मोठा धक्का देताना पाहायला मिळू शकते, असेही मत अक्रमने व्यक्त केले.

# वर्ल्डकपमधील भारताचे सामने ‘आयनॉक्स’च्या भव्य स्क्रीनवर

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. टी-२० विश्वचषकादरम्यान भारताच्या सामन्यांचा चाहते सिनेमागृहात आनंद घेऊ शकणार आहे. आयनॉक्सच्या मल्टिप्लेक्समध्ये टीम इंडियाचे सामने दाखवले जातील. यासाठी आयनॉक्सने आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेशी (आयसीसी) करार केला आहे.

## आयसीसीसोबत केला करार

ऑस्ट्रेलियात १६ ऑक्टोबरपासून टी-२० विश्वचषक स्पर्धेला सुरुवात होत आहे. भारताचे सर्व सामने सिनेगृहातदेखील प्रसारित केले जातील. चाहत्यांना २५ शहरांमध्ये ही सुविधा मिळेल. क्रिकेट चाहत्यांना मोठ्या पडद्यावर भारताच्या सामन्यांचा आनंद घेता येणार आहे, अशी माहिती आयनॉक्स लीझर लिमिटेडकडून देण्यात आली.

करारानुसार भारतीय संघाचे सर्व गट सामने आयनॉक्सच्या मल्टिप्लेक्समध्ये प्रसारित केले जातील. टीम इंडिया २३ ऑक्टोबरला कट्टर प्रतिस्पर्धी पाकिस्तानविरुद्ध आपल्या मोहिमेला सुरुवात करणार आहे. गट सामन्यांव्यतिरिक्त, उपांत्य फेरी आणि अंतिम सामनेदेखील आयनॉक्सवर दाखवले जातील.




# धोनीने केला नेटमध्ये सराव

**रांची : वृत्तसंस्था**

भारताचा माजी कर्णधार आणि फिनिशर फलंदाज महेंद्रसिंह धोनीच्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. धोनीने मैदानात उतरून सराव सुरू केला आहे. बऱ्याच दिवसांपासून मैदानाबाहेर असलेल्या धोनीचा एक फोटो सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे, ज्यामध्ये तो सराव करताना दिसत आहे.

भारतीय संघातील सर्वांत यशस्वी कर्णधारांपैकी एक महेंद्रसिंह धोनीने आगामी आयपीएलसाठी तयारी सुरू केली आहे. २०२३ची ही आयपीएल धोनीसाठी अखेरची असल्याचे मानले जात आहे. धोनीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटच्या तिन्ही फॉरमॅटमधून आधीच निवृत्ती घेतली आहे. तो सध्या फक्त आयपीएलमध्येच खेळताना दिसतो. अशात त्याचा सरावाचा फोटो पाहून चाहत्यांना धोनीकडून खूप अपेक्षा आहेत.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मिडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com